## प्रकरण २

## मध्ययुगीन भारतीय राज्ये आणि प्रशासकिय पध्दती

**प्रस्तावना**

१२०६ ते १५२६ हा कालखंड सुलतानाशाहीचा कालखंड मानला जातो. या काळात दिल्लीच्या सिंहासनावर गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद, लोदी इत्यादी घराण्यातील सत्ताधिशांचे वर्चस्व होते. २१ एप्रिल १५२६ च्या पहिल्या पानिपत युद्धात लोदीचा पराभव होऊन सुलतानशाहीचा शेवट झाला. त्यांचे प्रशासन अतिशय उत्तम होते. या सुलतानशाहीच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती विविध साधनातून मिळते. ही साधने फारसी अरबी भाषते लिहिलेली आहे. हसन निझामीचा ताजुल-मासीर, मिनहाज-उस सिराजचा तबकाए-ए नासीरी, झियाउद्दीन बरनीचा-तारीख-ए-फिरोजशाही, अमीर खुस्रोचा खजायम- उल फतुह, शम्सए-सिराज अफीरचा-तारीख-ए-फिरोजशाही, मोरोक्कोचा प्रवासी इब्नबतुताचा-किताब-उल-राहता, याहा-बिन-अहमदचा तारीख-ए-मुबारकशाही या ग्रंथाचा साधन म्हणून उपयोग होतो. त्याचप्रमाणे शासकीय पत्रव्यवहार, मांडलिक व सुभेदार यांचा पत्रव्यवहार, विविध कारणांसाठीचे विविध आदेश यांच्याआधारे मुलकी प्रशासन व्यवस्थेची माहिती मिळते. सुलतानशाही काळातील वास्तुकला, शिल्पकला यांच्या अवशेषांवरूनमाहिती मिळते. सुलतानशाही काळातील प्रशासनाचे केंद्रिय प्रशासन, प्रांतीय प्रशासन व स्थानिक असे तीन विभाग आहेत.

**सुलतान कालीन केंद्रिय प्रशासन व्यवस्था**

**१) सुलतान आणि त्याचे कार्य:** भारतात राज्य स्थापन करण्यापूर्वी मुस्लिम राज्यकर्त्यांनी सुलतान ही पदवी धारण केली होती. त्याचा अनेक अर्थाने उल्लेख केला जातो. कुराणामध्ये सुलतानचा उल्लेख भाववाचक रूपात केलेला आहे. प्रथम हिजरी शताब्दींच्या शेवटपर्यंत प्रांताचा गव्हर्नरच्या रूपात उल्लेख केलेला आहे. खिलाफतीचे विभाजन झाल्यावर अनेक प्रांतात स्वातंत्र्य घोषित केले. त्यांनी सुलतान ही उपाधी धारण केली. भारतात महंमद गझनीच्या वेळी सुलतान म्हणजे स्वतंत्र शासक असा त्याचा अर्थ होता.

सुलतान हा स्वतःच्या प्रदेशात अध्यक्ष/प्रमुख, सर्वोच्च, सेनाध्यक्ष, विधिनिर्माता, मुख्य न्यायाधिश समजत होता. राज्याची सर्व शक्ती त्याच्या हातात होती. त्यामुळे तो अनियंत्रीत सत्ताधारी होते. मुस्लिम कायदा शास्त्रानुसार सुलतानाचे पुढीलप्रमाणे कार्य.

१) इस्लामाचे रक्षण करणे

२) लोकांचे वाद मिटवणे,

३) भूप्रदेशाचे संरक्षण करणे

४) फौजदारी कायदे लागू करणे व बनवणे

५) मुस्लिम राज्यावर आक्रमण करणारांशी युद्ध करणे.

६) काफिरांच्या विरोधी जिहाद पुकारणे.

७) सर्व कर एकत्रित करणे

८) सार्वजनिक कोषातून योग्य लोकांना भत्ता देणे.

९) न्याय व सार्वजनिक कार्य करण्यास मदत करणारा अधिकारी नेमणूक करणे.

सुलतान स्वतःला ईश्वराचा प्रतिनिधी मानत असे. सैद्धांतिक दृष्टिकोणातून असे समजले जाते की, सुलतानाने कुराणाच्या नियमानुसार शासन चालवावे. परंतु व्यवहारात सुलतानांची हिंदूबाबत ही निती वापरली नाही. त्यांच्यावर अनेक प्रकारचे अत्याचार केले. हिंदुची पवित्र स्थाने अपवित्र करणे. धर्माच्या नावावर अधिकार व कर लादणे. म्हणजे सुलतानाची सत्ता निरंकुश होती. सुलतान हा प्रशासन यंत्रणेतील सर्वश्रेष्ठ होता. शासनाची सर्व शक्ती त्याच्या हाती होती. सर्व अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणे, बढती देणे, वेळप्रसंगी त्यांना पदच्युत करणे. त्याचा शब्द हा अंतिम निर्णय मानला जात असे. सुलतानाला राज्यकारभारात अनेक लोकांची गरज असे. आपल्या स्वार्थाच्या व हिताच्या रक्षणासाठी अमीरवर्गाची मदत गरजेची होती. उलेमावर्गाचा मुस्लिम समाजावर प्रभाव असल्याने, त्याची मदत गरजेची होती. बल्बन, अल्लाउद्दीन खिलजी, नासिरूद्दीन, खुस्रोशाह, महंमद तुघलक या सुलतानांनी उलेमाच्या वर्चस्वाला विरोध केला.

सुलतान प्रशासनात सैनिकी प्रशासनाला महत्त्व होते. त्यांच्या मदतीने राज्यात शांतता सुव्यवस्था ठेवणे. प्रशासन चालवणे. युद्धाचे नेतृत्व करावे लागत असे. राज्याच्या उत्पादन वाढीसाठी कर बसवणे, अनेकांना शिक्षा करणे, न्यायदान करणे. न्यायदान क्षेत्रातील सर्वोच्च अधिकारी होता. त्यांना काझीची मदत घ्यावी लागत असे. बलबन हा पहिला सुलतान होता की, त्याने न्यायदानाकडे प्रथम लक्ष दिले. इब्ज बतुताच्या मते महंमद तघलक आठवड्यात दोन दिवस दिवान-ए-खान मध्ये न्यायालय भरवत असे. सुलतान आपल्या प्रजेवर प्रभाव पाडण्यासाठी भव्य दरबाराचे आयोजन करीत असे. दरबारात येणे- जाणे याचे नियमानुसार पालन करावे लागत. सुलतान शेकडो दास-दासी ठेवत असे. सरदार मंडळी अनेक भेटवस्तू देत असे. त्याचे एकंदरीत जीवन विलासमय असे. मुस्लिम उलेमा, मौलाना यांचा आदर करत असे. सैन्यांची मदत मिळावी या हेतूने "शरा"चे पालन करत असे. राज्यातील व्यवहारीक प्रश्न मजलिए-ए-आम किंवा मजलिए-ए-खलबतच्या समोर ठेवत असे. या दोन्ही सभा म्हणजे सुलतानाला माहिती व सल्ला देणाऱ्या लोकांच्या सभा होत्या. सभेमध्ये सुलतानाचे विश्वासपात्र लोक, मित्र, हितचिंतक नातलग, उच्चाधिकारी असे. राज्याचे चार मंत्री असे. या समितीचा सल्ला सुलतानाला बंधनकारक नसे. सुलतान दुर्बल असेल तर सभा प्रबळ असे.

**२) मंत्रिमंडळः** सुलतानाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी मंत्रीमंडळ असे. गुलाम घराण्याच्या काळात वजीर, अरीज-इ-मामलिक, दिवाण-ए-इन्शा, दिवाण रिसालत हे चारच मंत्री होते. कालांतराने या मंत्र्यांच्या संख्येत वाढ झाली. बलबनने मंत्र्यामध्ये कार्यांचे विभाजन केले.

***1.* वजीर किंवा दिवाने वजारतः** सुलतान काळात वजीरचे पद स्थायी स्वरूपात होते. गुलामवंशाच्या प्रारंभापासून हे पद होते. तो राज्याचा प्रधानमंत्री व अर्थखात्याचा प्रमुख होता. त्याच्या कार्यालयात दिवाने वजारत असे म्हणत. राज्याच्या इतर विभागावर नियंत्रण ठेवणे. त्याला निश्चित असा पगार होता. राज्याला समृद्ध बनवणे. कर एकत्र करणे, अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करणे. कारखान्यातील वस्तूंच्या नोंदी ठेवले. घोडे, उंट, खेचर, अन्य प्राण्यांची नोंदी करणे, सैन्य व कलाकार यांना एकत्र करणे, त्यांचा पगार देणे, वाढवणे धर्मसंस्थानांची, विद्वानाची देखभाल करणे. विधवा व अनाथ यांचे रक्षण करणे. सार्वजनिक प्रश्नासंदर्भात निर्णय घेणे. व्यापार व्यवस्थित करणे.

वजीराला त्याच्या कामात मदत करण्यासाठी नायब वजीर हा अधिकारी असे. लेखा- परीक्षा करण्यासाठी मुशरिफ-ए-मुमालिक (महालेखाकार) मुस्लफी-ए मुमालिक (महालेखा परीक्षक) नावाचे अधिकारी होते. तकाबी कर्जाचे हिशोब मुजूमदार करत असे, जल्लाउद्दीन खिलजीच्या काळात दिवान-ए-वक्फ हा विभाग सुरू केला. तो खर्च संम्बंधी पत्रांची पाहणी करत असे. अल्लाउद्दीन खिलजीने दिवाण-ए-अमीरा- मुस्तकहराज नावाचा विभाग अर्थ विभागाच्या अंतर्गत सुरू केला. महंमद तघलकने दीवाण-ए-अमीरा-कोही नावाचा विभाग स्थापन केला.

*II.* **दिवान-ए-आरिज/आरिज-ए-मुमालिक (सैन्य मंत्रालय):** राज्याच्या सैन्य विभागाला दिवाण-ए-आरिज/दिवाण-ए-अर्ज असे म्हणतात. त्याच्या प्रमुखाला आरिज-ए- मुमालिक/सेनापती म्हणत असे. आरिज-ए-मुमालिकचे प्रमुख कार्य सैन्याची भरती करणे, सैन्यात सुव्यवस्था राखणे, व शिस्त राखणे, सैन्य व घोडे यांचा दर्जा चांगला राखणे सुलतानाच्या कार्यक्रमात मदत करणे. त्याच्या आदेशानुसार सैन्याचे नेतृत्व करणे.

*III.* **दिवाण-ए-इन्शा / दरबारे-खास (पत्रव्यवहार मंत्रालय):** सुलतान काळात दिवाण-ए- इन्शा हा राज्याचा पत्र विभाग होता. त्याच्या प्रमुखाला दरबारे खास/हुबीर असे म्हणतात. याचे प्रमुख कार्य म्हणजे विदेशी राजांना, राज्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांना पाठवणारी पत्र तयार करणे. महत्त्वाच्या पत्रांची नक्कल आपल्याजवळ ठेवत असे सुलतानाचा महत्त्वाचा पत्रव्यवहार तोच पहात असे. पत्रव्यवहार मंत्रालयाला मिनहाजने दीवाण-ए-अशरफ ही संज्ञा दिली आहे. त्याचा अध्यक्ष दबीर-ए-मुमालिक होय. शाही घोषणा व पत्रांचा मसुदा तयार करणे. त्यांच्या मार्फत सुलतानाचे आदेश सर्वांना पाठवणे. या कार्यालयात अनेक सचिव असे त्यांना डबीर म्हणतात. डबीरच्या अध्यक्षाला सदरूल मुहक म्हणत असे. सुलतानाच्या खाजगी डबीरला डबीर-ए-खास म्हणत. त्याचे काम म्हणजे सुलतानाबरोबर रहाणे, पत्रव्यवहार पहाणे. फतहनामा लिहिण्याचे कामही तोच करत असे. साहिब-ए-दीवाण-ए-इंशा हा सुलतानाच्या घनिष्ठ संबंधात असून सर्व राजकीय रेकॉर्ड सांभाळत असे. दीवाण-ए-इंशाचे कार्य अतिशय गुप्त चालत असे. म्हणून याचा प्रमुख हा सुलतानाचा विश्वासातील असे.

*IV.* **दिवाण-ए-रसालत (परराष्ट्रीय मंत्रायल):** या विभागाबाबत इतिहासकारांच्यात मतभेद आहेत. प्रो. हबीबुल्लाच्या मते, "परदेशी बाबींच्या संदर्भात हा विभाग होता. परदेशी पत्रव्यवहार, राजदूत पाठवणे व आलेल्या राजदूतांचे स्वागत करणे हे काम होते. डॉ. कुरेशी यांच्या मते, "या विभागाचा संबंध धार्मिक विषय व धार्मिक व्यक्ती, विद्वान यांना मदत करणे." परंतु डॉ. आशीर्वादाला, प्रो. हबीबुल्ला यांना हे मान्य नाही.

*V.* **सद्रस-सुदूर (धर्मादाय खाते):** सुलतान काळात सदुस-सुदूर हा धार्मिक विभाग असून त्याचा प्रमुख मुख्य काझी होता. त्याचे प्रमुख कार्य म्हणजे प्रजा कुराणानुसार जीवन जगते का? हे पहाणे धर्मपंडित, धार्मिक संस्था, शाळा, गोरगरीबांना, अनाथ यांना आर्थिक मदत करणे.

*VI.* **दीवाण-ए-काझा (न्याय मंत्रालय):** सुलतान काळात न्यायदान करण्यासाठी स्वतंत्र विभाग असे त्याला दीवाए-ए-काझा असे म्हणत त्याचा प्रमुख मुख्य काझी असे. न्यायव्यवस्थेचे तो निरीक्षण करत असे. तो न्यायालय भरवत असे. इतर न्यायालयाकडून आलेली अपील तो एकूण न्याय देत असे.

*VII.* **वरीद-ए-मुमालिक (गुप्तहेर खाते):** सुलतान काळात हे खाते महत्त्वाचे होते. राज्यातील सर्व माहिती सुलतानाला पुरवणे. अन्य देशातील व राज्यातील घडामोडीची माहिती मिळवणे. ती सुलतानाला पुरवणे. इ. कामे करावी लागत असे. डाक चौकियांचा प्रबंध ते करत असे.

*VIII.* **शाही प्रबंधक:** हा सुलतानाच्या गृह विभागाच्या प्रमुख असे. त्याच्या नियंत्रणाखाली वकील-ए-दर, अमीर-ए-हाजिब, नकीब, सरजांदार, बरीद-ए मुमालिक, दीवाण-ए-बन्दगार इ. अधिकारी असे. ते अधिकारी व त्यांचे कार्य प्रमाणे.

**१) वकील-ए-वर:** शाही महाल कुटुंब आणि सुलतान यांची व्यक्तीगत सेवा करणे. स्वयंपाक घराची व्यवस्था करणे, सुखसुविधा पुरवणे, आवश्यक वस्तूंचा पुरवठा करणे. त्याचा उच्चाधिकारी म्हणजे नायब वकिल-ए-दार होय.

**२) अमीर-ए-हाजिब:** वकील-ए-दरच्या नतरचा दुसरा अधिकारी होय. त्यालाच अमीर-ए- हाजिब-ए-बारबक असे म्हणतात. हा दरबारातील विधीनायक होता. दरबारी उत्सवांची प्रतिष्ठा राखणे. सुलतान आणि अधिकारी व जनता यांच्या मध्यस्थीचे काम करणे. सुलतान अनुपस्थित असेल तेव्हा नायब बारबक हा अमीर केल्यास राजधानीमध्ये सुलतानाचा नायब म्हणून काम करत असे.

**३) नकीब:** दरबारी समारंभ मध्ये नकीब हा अधिकारी असे. तो राजकीय शोभायात्राच्या पुढे-पुढे चालत असे. त्याच्या प्रमुखाला नकीब-उल-नकबा म्हणत. तो दरवाराच्या मुख्य दरवाजाच्या उंच चबुतरेवर बसलेला आहे.

**४) सरजांदार:** हा सुलतानाच्या अंगरक्षकांचा प्रमुख असे. डाव्याबाजूच्या अंगरक्षकाला सरजांदार-ए-मेमन तर उजव्या बाजूला असलेल्या अंगरक्षकाला सरंजादार-ए-मेसर म्हणत. बल्बनने सिस्तानी सैनिकांची या पदावर नियुक्त केले होते.

**५) दीवाण-ए-बन्वगान:** फिरोजशहा तघलकच्या काळात गुलामांची व्यवस्था करण्याच्या हेतूने हा विभाग सुरू केला. त्याचा प्रमुख अशहब-ए-दिवाण-ए बन्दगान होय, गुलामाची व्यवस्था करणे ही प्रमुख जबाबदारी होती.

**६) इतर विभाग:** सुलतानकाळात वरील विभाग, मंत्री यांच्या शिवाय अन्य विभाग मंत्री होते ते पुढीलप्रमाणे. दीथाण-ए, अमीर-कोही (शेतीमी), दीवाण-ए मस्तखराज (करवसुल खाते) मजलिस-ए-खलबत (सल्लागार मंडळ) अमीर-ए आखूर (पागाप्रमुख) मीर-ए-इमारत (मुख्य इंजिनियर) हाजीव (तहाप्रबंधक) वकील-ए-दार (किल्ल्या बाळगणारा) शेख-अल-इस्लाम (मुख्यधर्मधिश) इ. शासकीय अधिकारी होते.

**प्रांतीय प्रशासन**

सुलतानाची प्रांरभीची वर्ष है साम्राज्य विस्तार व सुरक्षा या प्रश्नांची सोडवणूक करण्यात गेली. त्यामुळे संपूर्ण राज्याचे त्यांनी विभाजन इक्तामध्ये केले. फारसी शासनाच्या आदेशावर महम्मद गझनीने पंजाबमध्ये इक्ता सुरू केला. खलिफाने आपल्या राज्याचे विभाजन इक्ता मध्ये करून अमीर किंवा आमीलो (गव्हर्नर) यांनी नेमणूक केली. त्यांच्याकडे आवश्यक प्रशासन व्यवस्था, लष्कर, महसूल याची जबाबदारी सोपवली. गुलाम वंशाच्या काळात प्रांतीय शासन व्यवस्थेचा साचा साधा सुधा बनवला त्याचा प्रमुख अधिकार सैनिकी होता. अब्बासी खलिकाने आपले राज्य इसादारकांच्या स्वाधीन केले. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात इक्ता बंद करून त्या ऐवजी सुबा तयार करण्यात आला. प्रारंभीच्या काळातील इका म्हणजेच नंतरच्या काळातील सुबा किंवा प्रांत होय. खिलजीच्या काळात ११ तर महंमद तघलकच्या काळात २३ प्रांताची संख्या होती. या इक्तादारांचे तीन प्रकार केलेले होते.

**१) इक्तादारांचे प्रकार:**

***1.* इमारत-ए-खास:** या प्रातांना अमर्यादित अधिकार होते. त्याना राज्यपालाचा दर्जा होता. या इक्तादाराचे कार्य म्हणजे, सैनिकी कामकाज पहाणे, मक्का यात्रेची तयारी करणे. शुक्रवार व ईदच्या सार्वजनिक नमाजाचे नेतृत्व करणे. काफिरांच्या विरोधी पुकरणे. लुटीच्या संपत्तीची वाटणी सैनिक व सरकारी कोषात १/५ इतकी करणे. सार्वजनिक सुरक्षा राखणे, कर बसवणे व गोळा करणे इ. अधिकार होते.

***11.* इमारत-ए-आम:** या वर्गातील इक्तादारांना मर्यादित अधिकार होते. केवळ सैनिकांची देखरेख करणे, बंडवाले व गुन्हेगारांना शिक्षा करणे. गृहसुरक्षा ठेवणे, त्यांना न्यायदान, नमाजाचे नेतृत्व, काजी-महसुल अधिकाऱ्याऱ्यांची नेमणूक करण्याचे अधिकार फौजदारी खटल्यात त्यांचा अधिकार होता.

***III.* इमारत-ए-इस्तिला:** वरील दोन इक्तदार गव्हर्नर शिवाय विधि-शास्त्रांचा तिसरा इक्कदार होता. हे पद अनाधिकार स्वरूपात प्राप्त झाले. ही व्यक्ती गव्हर्नर कायदा स्वीकार करण्यासाठी असे. एक प्रकारे इस्लामच्या आध्यात्मिक नेता असे. त्याला शपथ/प्रतिज्ञा घ्यावी लागत असे. खलीफाच्या सम्मान व वैभवाची सुरक्षितता राखणे, सार्वजनिक स्वरुपात खलिफाचे प्रति समर्पण प्रदर्शन करणे. खलिफामार्फत धार्मिक पदावर, काजी व ईमामचा सन्मान राखणे, सुलतान काळात तीन प्रकारचे इक्तदारक गव्हर्नर होते. लखनौ दूर असल्यामुळे स्वतंत्र गव्हर्नर स्वरूप अधिकार दिले. बंगालमध्ये अर्ध-स्वतंत्र गव्हर्नर बलबनने नियुक्त केला. अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिन भारतात वार्षिक कर घेऊन त्यांना अंतर्गत स्वातंत्र्य दिले. याप्रमाणे तीन गव्हर्नरला मान्यता दिला.

**२) सुलतान काळात प्रांताचे वर्गीकरण:** सुलतान काळात राज्यविस्तार प्रक्रियेत प्रांताचे वार्गीकरण वेगवेगळ्या कालखंडामध्ये वेगवेगळ्या स्वरूपात झाले. बलबन, अल्लाउद्दीन खिलजी यांनी राज्यविस्तार करून नवे प्रांत निर्माण केले. मुबारकशाह खिलजीने दक्षिण राज्यावर प्रभाव टाकण्यासाठी मुस्लिम गव्हर्नरची नेमणूक करणयाप्स सुरूवात केली. सुलतान काळात प्रशासन व्यवस्थेसाठी तीन प्रकारचे प्रदेश होते. या तीन प्रकारच्या प्रदेशातून तीन प्रांताचा जन्म झाला. ते पुढील प्रमाणे.

*1.* मुलतान, पुर्व पंजाब किंवा दोआब प्रदेशः हा प्रात लहान असून सुलतानाचे नियंत्रण अधिक होते. या प्रांताच्या गव्हर्नरला वली किया मूक्ती म्हणत असे. हे इमारत-ए-आमचे अधिकार उपभोग असे.

*II.* गुजरात, माळवा, बिहार व बंगाल प्रदेशः हा प्रांत केंद्रापासून दूर सुलतानाच्या व्यक्तीगत नियंत्रणापासून मुक्त होता. या प्रांताच्या गव्हर्नरला वली किंवा नायब म्हणत असे कधी-कधी सुलतान ही संज्ञा धारण करत असे. इमारत-ए-खासचे अधिकार उपभोगात असे. बलबनच्या भाऊ बुरगखान याने सुलतान ही संज्ञा बंगालच्या गव्हर्नर असताना धारण केली होती.

***III.* करव राज्यः** नाममात्र सुलतानाच्या नियत्रंणाखाली होता. हे स्वायत्तराज्य असून सुलतानाला कर देत असे. समकालीन इतिहासकार प्रांत या शब्दाचा उल्लेख करत नाही, तर राज्याचे विभाजन "इक्ता" व विलायन शब्दाने दाखवले आहे. हा शब्द मध्य अशियात प्रचलित होता. त्याला तुकीनी आपला बनवला. रेवर्टीच्या जहागीरच्या रूपात याचा उल्लेख केला आहे. इक्तामध्ये सुलतानाचा अधिकार होता. प्रो. कुरेशी यांच्या मते मुक्ती (इक्काचा अधिकारी) शब्दाचा प्रयोग गव्हर्नरसाठी केला जात असे. वली शब्द केवळ असाधारण शक्ती असणाऱ्या गव्हर्नरसाठी आहे.

**३) प्रांतीय अधिकारी:**

***1.* गव्हर्नर/मुक्ती/राज्यपालः** सुलतान काळात प्रांताचा प्रमुख गव्हर्नर मुक्ती असे. त्याची नेमणूक केंद्र सरकारकडून होत असे. प्रांताचे लोक त्याच्या विरूद्ध सुलतानाकडे तक्रार करत असे. गव्हर्नरवर सर्व नियंत्रण सुलतानाचे असे. हा प्रांताच्या राजधानीमध्ये रहात असे. त्याच्या अनुपस्थितीत नायब काम पहात असे. अलतमशने कनौजला नायब गव्हर्नरची नियुक्ती केलेली होती. गव्हर्नरचे वेतन एकूण उत्पादनाच्या १/२० भाग कमिशन म्हणून दिले जात असे. सुलतानाच्या प्रांरभीच्या काळात गव्हर्नरच्या अधिकाराखाली सैनिक व महसूल विभाग होता. आपल्या प्रांतात शांतत, सुव्यवस्था राखणे, सुलतानाला गरजेप्रमाणे लष्कर पुखणे. युद्धाच्यावेळी सैन्य पाठवणे. प्रजेकडून कर वसूल करणे. सुलतान कमकुवत असल्यास गव्हर्नर स्वतंत्रपणे वागत असे. बलबन व अल्लाउद्दीने खिलजी यांनी गव्हर्नरवर पूर्ण नियंत्रण ठेवले होते. महंमद तुघलक व फिरोजशहा तुघलकच्या काळात गव्हर्नर स्वतंत्रपणे वागत असे.

***1.* साहिब-ए-दिवाणः** हा प्रांताचा वित्त विभागचा अधिकारी असे. सुलतान, वजीराच्या शिफारशीनुसार त्याची नेमणूक होत असे. अर्थव्यवहार पहाणे हे त्याचे काम. जमा-खर्च तायर करणे, केंद्राला पाठवणे. त्याच्या मदतीसाठी मुस्तरिफ, कारकून होते.

*III.* ख्वाजाः याची नियुकी इकामध्ये केली जात असे. परंतु त्या प्रदेशातला कोणत्याही प्रकारातील इक्ता/प्रांत म्हणत नाही. अश्या प्रदेशात त्याची नियुक्ती केली जात. या प्रेदशातील कराचा हिशोब ठेवणे. सुलतानाच्या आदेशानुसार केंद्रिय कोषागारात जमा करणे त्याची नियुक्ती वजीराच्या शिफारशीनुसार सुलतान करत असे. इक्तामध्ये त्याची उपस्थिती म्हणजे गव्हर्नरच्या अधिकारावर एक प्रकारचे नियंत्रण होते.

**स्थानिक प्रशासन**

१*)* **शिक (जिल्हा):** प्रांताचे विभाजन जिल्ह्यामध्ये केलेले होते. त्यास शिक असे म्हणत. त्याच्या प्रमुखाला शिकदार असे म्हणत. त्याचे काम आपल्या विभागात शांतता व सुव्यवस्था राखले होय.

**२) परगाणाः** शिकाचे विभाजन परगने मध्ये केलेले असे. त्यामध्ये साधारण ८४ ते १०० खेडी असे. त्याचा प्रमुख चौधरी असे. त्याच्या मदतीसाठी आमल व मुशरफ असे. आमलचे कार्य शांतता राखणे तर मुशरफचे कार्य महसूल वसूल करणे. याशिवाय एक खजाची, दोन कारकून एक कानूनगो इ. कर्मचारी होते. शेतकऱ्याच्या अवस्थेची माहिती अधिकाऱ्यांना देण्यासाठी चौधरी हा अधिकार असे.

**३) ग्राम/खेडः** परगाण्याचे विभाजन गावात केलेले आहे. प्रशासनातील सर्वात शेवटचा घटक म्हणजे गाव होय. खेड्याचे प्रशासन स्वयंपूर्ण होते. हा सर्वांत छोटा इक्ता होता. कारभार पंचायत करत असे. प्रमुख मुकादम असे. खोत, चौधरी, पटवारी, चौकीदार इ. कर्मचारी होते. नम्बरदारचे कार्य वसुल गोळा करणे व शांतता राखणे, अल्लाउद्दीन खिलजीने शेतसारा वसुल करण्याच्या कामातून मुक्तता केली.

**४) नगरप्रशासनः** मोठ्या शहरास नगर म्हणत असत. नगराचा कारभार पाहण्यासाठी कोतवाल नावाचा अधिकारी असे. नगराचे प्रशासन, सुव्यवस्था इ. कामे करावी लागत असे. त्याच्या मदतीसाठी प्रशासकीय नोकरवर्ग असे.

**सुलतानशाहीतील महसुल (*REVENUE*)**

सुलतानशाही काळातील वित्त व्यवस्थेचा आधार म्हणजे शरा व अब्बासिद खलीफांची परंपरा होती. त्याच प्रमाणाने सुन्नी पंथीय पंडिताच्या हनफी संप्रदायावर आधारित आर्थिक धोरण होते. सुलतान कालीन उत्पन्नाची साधने दोन प्रकारची होती. धार्मिक स्वरूपाची व धर्म निरपेक्ष स्वरूपाची.

**१) धार्मिक स्वरूपाची साधनेः**

***1.* जकातः** हा प्रथम श्रेणीचा कर होता. हा केवळ मुसलमान वर्गाकडून वसूल केला जात असे. त्यालाच सामुहिक रूपात जकात असे म्हणतात. हा धार्मिक कर होता. व्यक्तीच्या एकूण उत्पन्नाच्या १/४ इतका हिस्सा द्यावा लागे, त्याला निसाब असे म्हणतात. त्याची वैशिष्ट्येपूर्ण तत्त्वे.

१) यावर सुलतानाचा पूर्ण अधिकार असे.

२) हा जीवनाच्या मौलिक आवश्यकतेपेक्षा अधिक आहे.

३) ऋणातून मुक्त होणे. जकातीपासून गोळा झालेला उत्पन्न सामाजिक कामे, मशिदीची दुरुस्ती, धार्मिक कार्य करणारे व गरीब लोकाना मदत दिली जात असे. ज्याची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. त्या मुस्लिम लोकांकडून हा कर गोळा केली जात असे.

***ii.* आयात-निर्यातकरः** आयत-निर्यात संबंधी वस्तुवरही व्यापारी कर बसवला होता, वस्तुच्या किंमतीच्या दोन टक्के मुसलमान व चार टक्के हिंदू व्यापाऱ्याकडून कर घेतला जात असे. घोडे आयातकर मुसमानाकडून ५ टक्के तर हिंदुकडून १० टक्के कर वसूल केला जात असे. इब्न बतूताच्या नुसार सुलतान आयात कराच्या स्वरूपात चौथाई वसूल करत असे. परंतु महमद तुघलकने तो बंद केला. सिकन्दर लोदीने अन्न-धान्यावरील कर कमी केला. दांगानाह नावाचा कर लागू केला. तो फिरोज तुघलकने तो रद्द केला.

**२) धर्म निरपेक्ष करः** चुलतान काळामध्ये भूमिकर (असर उशर), खम्स, खरज, जिझिया इ. करांचा प्रामुख्याने समावेश होतो.

***1.* भूमिकर (अशर/उशर कर):** हा महसूल उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. सर्व जमिन सुलतानाच्या ताब्यात होती. प्रारंभीच्या काळात उत्पन्नाचा पाचवा भाग शेतसारा घेत असे. अल्लाउद्दीन खिलजीने १/२ एवढा शेतसारा गोळा केला. साधारण शेतसारा उत्पन्नाचा १/१० टक्के भरावा लागत असे. सर्व जमिनीचे एकूण चार प्रकार होते.

१) खलिसा

२) इक्तमध्ये विभागलेली जमीन, 'मुक्तीच्या मालकीची असते.

३) तालुक्यातील किंवा खेड्यातील हिंदू प्रमुखांच्या ताब्यात काही जमीन असे. ते स्वतः सुलतानाशी बांधील असत.

४) जमीनीचा चौथा प्रकार म्हणजे मुस्लिम विद्वान व संतांना दान दिलेली जमीन होय.

पहिल्या प्रकारातील जमिनीचा महसूल उपविभागातील अमिल नावाचा अधिकारी, चौधरी, मुकादम यांच्यामार्फत शेतकऱ्यांकडून गोळा करीत असे. केंद्र सरकारमध्ये भरत असे. 'इक्त' मधील महसूल मुक्ती गोळा करीत असे व आपला वाटा काढून घेत, उरलेला महसूल सरकारात जमा करीत असे. वक्फ जमीन किंवा इनाम जमिनीवर कर नसे.

***II.* खम्स करः** युद्धातील लुटीच्या संपत्तीला खम्स म्हणतात. शराच्यानुसार सर्व लुटीच्या संपत्तीमध्ये १/५ भाग सरकारच्या खजिन्यात जमा करणे व उरलेला ४/५ भाग सैनिकाना समान वाटणे, सुलतानाने निवडलेल्या वस्तूना सफीयाह म्हणत असे. अल्लाउद्दीन खिलजीने. ४/५ हिस्सा सरकारात जमा केला व १/५ हिस्सा सैनिकांना वाटला. जमिनीमध्ये गडलेली संपत्ती प्राप्त झाली तर, ज्याने शोधून काढली त्याला ४/५ व सरकारला १/५ हिस्सा दिला जात असे. ज्याने ही संपत्ती शोधून काढली. परंतु त्या जमिनीचा तो मालक नसे तर, जमिनीच्या मालकाला ४/५ हिस्सा दिली जात असे. एखादी मुस्लिम व्यक्ती पुत्रहीन मरण पावला तर, त्याची सर्व संपत्ती सरकार जमा केली जात. त्याचप्रमाणे सुलतानाला भेट, नजराणा इ. स्वरूपात वस्तू मिळत असे.

***III.* खिराज करः** हा शेतीकर असून तो सुलताना मार्फत वसूल केला जात असे, मुस्लिमेत्तर शेतकऱ्याच्या जमिनीवर ठेवलेल्या करास खिराज असे म्हणतात. तो कर १/१० टक्क्यांपासून १/२ टक्क्यापर्यंत ठेवलेला असे. अल्लाउद्दीन खिलजीने भूमिकर शिवाय धरकर, कुराणकर (गायरानकर) सुरू केला. अफीफच्या सूचीनुसार दिल्लीमध्ये किराजमीन, जजारी, दनमान हा कर लागू होता. किरा जमिन म्हणजे घर व दुकानावरील कर, तो गरीब व विधवाकडून वसूल केला जात असे. १.५० लाख टंका वार्षिक कर वाढला. जजारी म्हणजे प्रत्येक प्राण्याच्या कातडीवर कसाईकडून १२ जीतल कर गोळ करत दनगान म्हणजे जकात नाका कर.

***Iv.* जिजिया करः** हा कर मुस्लिमेत्तर म्हणजे हिंदवर बसविला होता. हिंदना जेरीस आणून धर्मांतरास भाग पाडावे. राज्याच्या खजिन्यात भर पडेल. या उद्देशाने हा कर आकारला जात असे. स्त्रिया, मुले, भिकारी, गुलाम, दरिद्री लोक यांना हा कर नसे. इतर लोकांच्या ऐपतीप्रमाणे तीन वर्गात हा कर वसूल केला जात असे. सर्वांत श्रीमंत लोकाकडून ४८ दिरहम, दुसऱ्या वर्गाकडून २४ तर तिसऱ्या वर्गाकडून १२ दिरहाम कर घेतला जात असे. (एक दिरहाम म्हणजे २५ ते ३० पैसे होय.) या करासंदर्भात अनेक इतिहासकारांच्यात मतभेद आहेत. डॉ. कुरेशीच्या मतानुसार मुस्लिम साम्राज्यात मुसलमानेत्तर, हिंदू, ख्रिश्चन वगैरे धर्मीयांना (म्हणजे जिम्मीना) सुरक्षित राहू देण्याचा जिम्मी (हमी) घेण्याबद्दलचा मोबदला होय. काहीच्या मते सैनिक सेवेच्या मोबदल्यात जिझिया घेण्यात येई.

**सुलतानशाहीतील न्याय व्यवस्था**

१) मुसलमान कायद्याच्या आधारभूत गोष्टीः मुसलमान कायदा कुराण, हदीस, हज्मा, कियास या चार गोष्टीवर आधारित आहे. इस्लामी कायद्याचा मुख्य व आधारभूत स्त्रोत म्हणजे कुराण होय. कुराण नंतरचा दुसरा आधार म्हणजे हदीस किंवा सुन्नाह आहे. एखाद्या घटनेचे कुराणातून समाधान होत नसेल. त्यामध्ये त्याचा उल्लेख नसे. अश्या वेळी

मागील न्यायनिवाड्याच्या आधार घ्यावा लागत असे. कायद्यामध्ये प्रविण असणाऱ्या लोकांनी मुस्लिम समाजाच्या हितासाठी त्यानी बनवलेले कायदे म्हणजे झज्मा होय. वेळोवेळी बऱ्याच कायदेसंहिता तयार करण्यात आल्या. यामध्ये शेवटची संग्रह म्हणजे फतवा-ए-आलमगिरी होय. धर्मशास्त्र हेच न्यायशास्त्रज्ञ होते.

**२) मुस्लिम कायदे**: इस्लामी धर्मशाळा संबंधीचे कायदे केवळ मुसलमानांना लागू असे. या कायद्याचे चार विभागात विभाजन केलेले असे.

**१) दिवाणी कायदे:** याच्या अंतर्गत इस्लामाचे धार्मिक कायदे केवळ मुसलमानासाठीच आणि व्यापारासंदर्भात सर्वांना समान कायदा असे.

**२) भूमि संबंधी कायदा:** अरबांची कर व्यवस्था भारतात सर्वांना लागू करणे.

**३) इस्लामी फोजदारी कायदा:** धार्मिक कायद्याच्या उल्लंघना संदर्भात हा कायदा होता. हा केवळ मुसलमानांना लागू होता.

**४) गैरमुसलमाना संदर्भात:** मुसलमान सोडून सर्वांना त्याच्या धार्मिक व व्यक्तीगत कायद्यानुसार त्यांना कायदा लागू असे.

**३) न्यायलयाचे प्रकार:** सुलतानशाहीच्या काळात पाच प्रकारची न्यायालये होती. सर्व न्याय व्यवस्थेचा प्रमुख न्यायाधिश सुलतान असे. त्यात्था नियंत्रणाखाली न्यायदानाचे काम चालत असे. न्यायदानाच्या कार्यासाठी दिवाण-ए-काझ हे स्वतंत्र खाते होते. पाच प्रकारची न्यायालये म्हणजे पहिली तीन न्यायालये विशिष्ट प्रकारची होती.

१) दिवाणी: फौजदारी खटल्याचे न्यायालय

२) नोकरवर्गाच्या संदर्भातील न्यायालय

३) लष्करी स्वरूपाचे न्यायालय

४) प्रांतिय स्वरूपाचे न्यायालय

५) पंचायत न्यायलय

४) न्याय व्यवस्थेतील अधिकारीः

**अ) केंद्रिय न्यायव्यवस्थेतील अधिकरी:**

**१) सुलतान:** सुलतानशाही काळात न्यायसंस्थेचा प्रमुख सुलतान होता. तोच सर्वोच्च न्यायाधीश असे. व्यवहारात सर्व न्यायदानाचे कार्य काझीच्या मार्फत होत असे. कुराण व हदीसच्यानुसार न्यायदान केले जात असे. फौजदारी खटल्याचा निर्णय इस्लाम परंपरानुसार दिला जात असे.

**२) काझी-ए-मुमालिक:** न्यायदानासाठी दिवाण-ए-काम स्वतंत्र विभाग असे. त्याचा प्रमुख वरिष्ठ काझी म्हणजे काझी-ए-मुमालिक असे. तो सामान्य दिवाणी व फौजदारी खटल्याबाबत मुख्य न्यायाधीश असे. त्याची नेमणूक सुलतान करत असे. सुलतानाचा दरबार आठवड्यातून दोन वेळा भरत असे. त्यामध्ये उच्च स्तरावरील व अपील केलेल्या खटल्याचा निकाल देत असे. सुलतानाला तो राज्याभिषेकांची शपथ देत असे. राज्याचे नियम बनवण्यासाठी सुलतानाला मदत करत असे.

**३) पंडित:** एखादा खटला हिंदू व्यक्तीगत कायद्याच्या अंतर्गत दिवाणी क्षेत्रातील असेल तर तो खटला पंडिता मार्फत चालवत असे. त्याचा दर्जा मुक्ती समान असे.

**४) दिवाण-इ-मझालिमः** नोकरवर्गाचा खटला चालवण्यासाठी व कज्जांचा निकाल देण्यासाठी एक स्वतंत्र न्यायालय असे. त्याचा प्रमुख दीवाण-इ-मझालिम हा न्यायाधीश होता.

ब) प्रांतीय न्याय व्यवस्थेतील अधिकारीः सुलतान काळात प्रांतीय न्यायालय चार प्रकारची होती.

१) सुभेदाराचे/प्रातधिकाऱ्याचे न्यायालय

२) काझी-ए-सुबा न्यायालय

३) दीवा ए-सुबा न्यायालाय

४) सदर-ए-सुबा न्यायालय,

**१) प्रांतधिकाऱ्याचे न्यायालयः** सुभेदार/प्रांतधिकारी हा सुलतानाचा प्रतिनिधी असे. म्हणून त्याचे न्यायालय हे प्रांतातील उच्च न्यायालय असे. खटल्याची सुनावणी एखह करत असे. अपील अंटला काझी-ए-सुबा न्यायालयाकडे पाठवत असे. प्रांतातील इतर न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध प्रांतधिकान्याच्या न्यायलयात अपील केले जात असे. त्याच्या निर्णया विरूद्ध केंद्रीय न्यायालयात अपील करणे प्रांतीय न्याय व्यवस्थेत मुक्ती/प्रांताधिकारी, मुन्सिब, पंडित, ददबक हे प्रमुख होते. पहिले तीन अधिकारी केंद्राशी संबंधीत होते.

**२) काजी-ए-सुब न्यायालयः** या विभागातील न्यायाधिकाराची नेमणूक केंद्रिय काझीकडून सुलतानामार्फत होत असे. प्रांतधिकाऱ्याला प्रशासनाचे काम असल्याने न्यायालय सुरू करण्यात आले. त्याच्या न्यायालयाच्या निर्णया विरूद्ध प्रांतधिकाऱ्याऱ्यांच्या न्यायालयात अपील केले जात असे. हा दिवाणी व फौजदारी खटले चालवत असे. भूमिसंदर्भातील खटले त्याच्याकडे नसे. परगाण्याच्या काजीवर नियंत्रण ठेवणे. त्यांच्या निर्णयाविरूद्ध अपीलांची सुनावणी चालवणे. इक्तांची देखभाल करणे.

**३) दीवाण-ए-सुबा** न्यायालयः या न्यायालयात केवळ जमिन महसूल संबंधीचे खटले चालवले जात असे. याच्या निर्णयाविरुद्ध प्रांताधिकाऱ्याच्या अथवा केंद्रीय न्यायालयात आपील करता येत असे. जमीन महसूल संदर्भातील निर्णय अमील व इतर महसूल अधिकारी देत असे. त्यांच्या निर्णयाविरुद्ध या न्यायालयात अपील करत असे.

**४) सदर-ए-सुबः** प्रांतीय न्याय व्यवस्थेतील शेवटचे न्यायालय होय. याचे मुख्य कार्य प्रांतातील धार्मिक कार्याची देखभाल करणे. विद्वान व शिक्षण संस्थांना अनुदान देणे. धार्मिक वाद निर्माण झाल्यास ते सोडवले.

**क) स्थानिक न्यायव्यवस्थाः** स्थानिक न्यायव्यवस्थेतमध्ये जिल्हा न्यायालय असे शिकदार प्रमुख असे. काजी, कोतवाल, ग्रामपंचायत निर्णय विरूद्ध या न्यायालयात अपील केले जात असे. तालुक्याच्या व शहरात न्यायदानासाठी काझी असे. राजधानी व मोठ्या शहरात कोतवाल हा न्यायदानाचे काम करत असे गावामध्ये पंचायत न्यायदानाचे कार्य करत असे.

**उ) मुहतसीबः** हा न्यायदानाचा अधिकारी होता. जे खटले सामान्य न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येत नसत व ज्यात संबंधित व्यक्ती गुन्हा कबूल करीत नसे.

***1.* पायदलः** सर्वांत जास्त संख्या पायदळात होती. स्थिर युद्ध लढण्यासाठी पायदळ प्रभावी ठरत असे. यामध्ये बरेच गुलाम असत.

***iii.* तोफखानाः** या विभागात तोफा, दोरूगोळी, येत असे. किल्ले जिंकण्यासाठी व शत्रूपक्षाची सैन्य रचना उद्ध्वस्त करण्यासाठी तोफखाना प्रभावी ठरत असे.

***iv.* आरमारः** सुलतान काळात नाविक दल फार महत्त्वाचे नव्हते. सागरी भागावर आरमार ठेवत असे.

**v. किल्ले:** किल्ला हा सैन्याची महत्त्वपूर्ण शक्ती व राज्याची सुरक्षा असे. या काळात किल्लाचे महत्त्व अतिशय होते. कारण सतत मोगलाचे आक्रमण होत असे. बलबनने उत्तर-पश्चिम सीमनेवर कम्पिल, पटियाली, भोजपूर येथे किल्ले निर्माण करून शक्तीसाठी रक्षक सेना ठेवली होती. अल्लाउद्दीन खिलजीने या किल्लाचा जीर्णोद्वार केला व नवे किल्ले निर्माण केले. प्रत्येक किल्ल्यावर एक आदेशक किंवा कोतवाल असे. तो किल्ल्याची निगा राखत. किल्ल्यावर अनेक मुफरिद असे. त्याचे स्वरूप इंजीनियरसारखे असे. प्रत्येक किल्ल्यावर काजी किंवा मीरदार असे. किल्ला अतिशय विश्वासपात्र व योग्य मौरदाराच्या ताब्यात असे. किल्ल्यावर एख गुम मार्ग असे. संकटकाळी तेथून सुरक्षित जाता यावे.

**३) सैन्यरचना व अधिकारी:** सुलतान काळात लष्कराचा कोणीही कायमचा सेनापती नसे. सुलतान स्वतः त्याचा अध्यक्ष व सेनापती असे. प्रत्येक युद्धाच्या वेळी एका सेनानायकाची निवड केली जात असे. त्याचा काळ युद्ध समाप्ती बरोबर संपत असे. सैन्याची व्यवस्था व संघटना रझिया शासन काळात फक्त सेनापतीचा नियुक्ती केलेली होती. सैन्याची व्यवस्था व संघटन करण्यासाठी आरिज-ए मुमालिक व नायब आरिज- ए-मुमालिक हे अतिशय महत्त्वाचे अधिकारी होते. त्यांच्या मार्फत सैनिकांची हजेरी, नोंदी, घोड्यांना डाग देणे, इतर व्यवस्था करणे, अल्लाउद्दीन सदैव युद्धावर नायबला पाठवत असे. त्याचे काम रसद व इतर वस्तूंचा पुरवठा करणे. लुटीचा हिशोब सुलतानाला देणे. आरिज नंतरचा महत्त्वाचा अधिकारी अमीर-ए-आखूर होय. हे पद अतिशय विश्वासातील महत्त्वाच्या व्यक्तीकडे दिले जात. हा जास्त काळ राजधानीत सुलतानाबरोबर असे. सैनिकाजवळ एक घोडा असेल तर त्यास याक आस्प असे म्हणत तर त्याच्याजवळ दोन घोडे असतील त्यास दोन अस्प म्हणत असे. दहा घोडेस्वाराची एक तुकडी असे, त्याचा प्रमुख सरखेल असे. दहा सरखेलावर एक सिपाहसालार असे. दहा सिपाहसालार वर एक अमीर असे. दहा अभिरावर एक मलिक असे. खान हा एक लाख सैन्याचा प्रमुख असे. आरीज-ए-मुमालिक हा युद्धखात्याचा मंत्री असे.

**४) लष्कराची संघटना व शरव:** सुलतानशाही काळात सैन्याचे व्यवस्थापन अतिशय चांगले होते. घोडदळातील सैनिकांची वेशभूषा, आणि शस्व तुर्की आदेशावर आधारित होते. घोडा, चौगान खेळास समर्थ असे सैनिक आपल्या सुरक्षेतेसाठी कवच व सिर- रक्षक असे. प्रत्येक सैनिकाजवळ दोन तलवारी, एक खंजीर, तुर्की कमान आणि किस्म असे. रकाब व तरकश अश्या दोन तलवारी असे. हत्तीसेन महत्त्वाची असून प्रभावी होती. बलबन एका हत्तीला ५०० घोडे स्वारीच्या समान मानत असे. महमंद तचलकजवळ ३ हजार होते. हत्तीला युद्धार्ये प्रशिक्षण दिले जात. हत्तीचा उपयोग सैनिक, लाकूड, सामान वहातुकीसाठी करत असे. हत्तीची देखभाल करण्यासाठी शहना-ए-फील अधिकारी असे. पायदल सेनेला पायक म्हणत असे.

सुलतान काळात विविध प्रकारची शस्त्र होती. अग्निबण, भाले, स्फोटक पदार्थ, तोफा (संग- ए-मगरिबि) इ. शस्त्र शत्रूवर मार करण्यासाठी असे. त्याच प्रमाणे तलवार, भाला, खंजीर सुरंग इ. युद्धात उपयोग केला जात असे.

**५) युद्ध संघटना व्यवस्था:** युद्धाच्या वेळी रसद व इतर व्यवस्था बजारोमार्फत केली जात होती. सुलतानाची युद्धनिती परंपरागत होती. युद्ध क्षेत्राची निवड करताना भूप्रदेश, हवा, सूर्य याची काळजी घेत असे. सैन्याची मध्य, उत्तर, दक्षिण म्हणजे भागात व हरावल व चन्दावळच्या स्वरूपात नियोजन केले जात असे. जेव्हा सुलतान स्वतः युद्धाचे नेतृत्व करतो. तेव्हा तो मध्यभागी असे सभोवती उलेमा वर्ग असे. त्याच्या मागे- पुढे धनुर्धारी असे. सर्वांत आघाडीवर हत्तीची तुकडी असे. त्याच्यानंतर घोडेस्वार, त्यानंतर पायदल सैनिक असे. त्यांच्यामध्ये मोकळी जागा असे, त्यातून घोडेस्वार जाऊन शत्रूवर आक्रमण करत असे.

वजीक (स्काऊट) सेना महत्त्वाची असे. हे लष्कराचे डोळे होते. ते गुप्तपणे फिरत असे. शत्रू पक्षात जाऊन बातमी मिळवणे. हे त्यांचे कार्य होते. लष्कराबरोबर एक दवाखाना असे. सुलतानाजवळ दोन प्रकारचे ध्वज असे.

१) डाव्या पक्षात काळा रंगाचा ध्वज, तो अब्बासिद खलिफाचा प्रतिक होता. २) उजव्या पक्षात लाल रंगाचा ध्वज, तो घोरीचा प्रतिक होता. कुलूबउद्दीन ऐबकने ध्वजावर नव-उदिन चंद्र, परदार, साप, सिंहाची आकृती कोरली होती.

फिरोजशहाच्या ध्वजावर परदार साप कोरलेला होता. गिवासुद्दीन तुघलक व नासिरूद्दीन खुशरावने माशाचे चित्र कोरले होते. तधलकाच्या काळात एका खानाला ७ व एका अमीराला ३ ध्वज दिले जात असे.

**६) पोलिस व्यवस्थाः** सुलतानकाळात पोलिस व्यवस्था कोतवालाकडे सोपवलेली होती. केंद्रिय व प्रांतीय राजधानी, मोठ्या शहरात शांतता राखणे हे काम होते. शहरात चोऱ्या, दंगे, धोके होऊ नये, यासाठी रात्री गस्त घालणे राजमार्गावर पहारा देणे इ. कामे करावी लागत. साम्राज्यात सर्वत्र गुप्तहेरांचे जाळे असे. सर्वप्रकारची माहिती सुलतानाला देणे. सुलतान काळातील प्रशासन व्यवस्थेचे स्वरूप अशा प्रकारचे होते. प्रत्येक क्षेत्रात सुलतानाचा शब्द हाच शेवटचा मानला जाई.

सुलतानशाही काळातील सुलतान, त्यांचे कार्य यांचा अभ्यास केल्यावर या काळातील राजकीय प्रशासन कसे होते, याचा अभ्यास करणे तेवढेच महत्वाचे ठरते. सुलतान काळात केंद्रीय व्यवस्था ही सर्वात उच्च दर्जाची मानली जात होती व या व्यवस्थेचा मुख्य सुलतान असे व त्याच्या हाताखाली विविध प्रांतावर नियंत्रण करण्यासाठी प्रांतीय प्रशासन होते. यातही विविध विभागांकडून प्रांताची कामे व नियंत्रण केले जाई. इक्कापद्धत ही प्रांतांवर लादलेली होती. शेवटचे प्रशासन म्हणजे स्थानिक प्रशासन ज्यात नगर व ग्राम प्रशासनाचासमावेश होत असे. प्रशासन व्यवस्थेतील महत्वाचे इतर घटक म्हणजे महसूल व्यवस्था, न्यायव्यवस्था, सैन्यव्यवस्था, सुरक्षाव्यवस्था, पोलीसव्यवस्था या सर्वांचा अभ्यास या प्रकरणाच्या दृष्टीने महत्वाचा ठरतो.

# मोघलकालीन प्रशासन :-

**प्रस्तावना**

मध्ययुगीन इतिहासामध्ये मोगलांचा कालखंड अतिशय महत्त्वाचा होता. त्यांनी सुमारे पाचशे वर्ष भारतावर राज्य केले, विशाल साम्राज्य, कार्यक्षम प्रशासन यंत्रणा, आर्थिक संपन्नता ही या काळाची वैशिष्ट्ये आहेत. १५२६ ते १७०७ हा काळ अतिशय प्रभावी काळ होता. मोगल साम्राज्याचे प्रशासन हा अभ्यास महत्त्वाचा आहे. मोगल प्रशासनासंदर्भात माहिती देणारी अनेक साधने आहे. अबुलफजलचा ऐने-अकबरी, मुतमदखानचा इक्बालनामा, अब्दुल हमीद लाहोरीचा पादशाहनामा, बदायुनीचा मुन्तखबुल तवारीख, निजामउद्दीनचा तबकात-इ-अकबरी इ. समकालीन ग्रंथाच्या आधारे प्रशासनाचे स्वरूप समजते. दस्तुर उल आलम सारखे दप्तर आणि मोगल सुभेदारांचा व अन्य अधिकाऱ्यांचा पत्रव्यवहार याच्या आधारे प्रशासनाचे बारकावे लक्षात येतात. मोगल काळात अनेक पाश्चात्य प्रवाशी आले. त्यांनी आपल्या प्रवास वर्णनात अनेक घटना नोंदल्या आहेत. सर थॉमस रो, हॉकीन्स, मनुची, बर्नियर इ. च्या वृत्तांतामधून प्रशासनाची माहिती मिळते. पोर्तुगिज, डच, पत्रव्यवहारातून प्रशासनाची माहिती मिळेत. यदुनाथ सरकार यांच्या मते, "मोगल शासन व्यवस्था म्हणजे हिंदुस्थानच्या भूमीत रुजली गेलेली अरबी व फारसी यांची मिश्र शासनव्यवस्था होय. डॉ. ईश्वरी प्रसाद यांच्या मते "मोगल साम्राज्याची शासन पद्धत मध्ययुगीन काळाच्या अभ्यासासाठी महत्त्वाची आहे. शिवाजी महाराजांनीही सर्वप्रथम महाराष्ट्रात काहीअंशी ह्याच शासन पद्धतीने अनुकरण केले." मोगलांच्या शासन व्यवस्थेवर विदेशी प्रभाव होता. ग्रामीण शासन व कर पद्धती ही भारतीय होती. संन्य व्यवस्था तुर्की प्रणालीची होती. त्यांचा उत्तराधिकाराचा नियम निश्चत नसल्याने, गादी प्राप्तीसाठी रक्तरंजित संघर्ष होत होते. मोगल प्रशासनाचे तीन विभागात विभाजन केलेले होते. अ) केंद्रिय । मध्यवर्ती प्रशासन) प्रान्तीय प्रशासन क) स्थानिक प्रशासन

**मोगलांची केंद्रिय / मध्यवर्ती प्रशासन व्यवस्था**

**१) बादशहाचे अधिकार व दिनचर्या,** कुराणाच्या वचनाप्रमाणे मुस्लिम राज्यकर्ता हा इस्लामी जनतेचाच शासक असतो. केंद्रिय प्रशासनाचा मुख्य व सर्वेसर्वा होता. त्याचे अधिकार अनियंत्रित व अमर्यादित होते. राज्याचा सर्वोच्च सेनापती व न्यायाधिश होता. राज्यकर्ता जुलमी व धर्माची तमा न बाळगणारा असेल तर त्याला पदच्यूत करत असे. बाबर, हुमायून यांनी इस्लामी राजनितीला अनुसरूनच राज्ययंत्रणा निर्माण केली. परंतु अकबराने सर्व प्रजेचा सम्राट

म्हणून मान्य केले होते. अबुल फजलच्या मते, शस्त्रधारणा व राज्यविस्तार हे सर्व राजसिंहासन आणि राजमुकूटाच्या शोभेकरता नसून प्रजापालनासाठी आहे, अशी अकबराची भूमिका होती. शहाजहानच्या काळात सहिष्णू धोरणाला तडा गेला. औरंगजेबच्या काळात पुन्हा कडव्या इस्लामी धोरणाचा शासन व्यवस्थेत अवलंब झाला. मोगल राज्यपद्धतीमध्ये वारसा नियमाचा अभाव होता. त्यामुळे सिंहासन प्राप्तीसाठी अनेक बंड, कट-कारस्थाने, वारसायुद्धे इ. घटना घडल्या होत्या. अकबराचा भाऊ मिर्झा हकीमने सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. जहांगिरने अकबरविरूद्ध तर खुसरो व शहाजहानने जहांगिर विरूद्ध बंड केले. औरंगजेबने राजपदासाठी भावाशी युद्ध केले.

मोगल बादशहांनी खलिफाचे सर्व श्रेष्ठत्व मान्य केले नाही. अकबराने उलेमांचे वर्चस्व मान्य केले नाही. १५७९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या महजरमध्ये उलेमा त्याचे विचार आपल्यावर लादू शकणार नाहीत, असे अकबराने स्पष्ट केले. मुस्लिम न्यायपंडितांनी लावलेले कायद्याचे अन्वयार्थ आपल्याला बंधनकारक नाहीत, असे अकबराचे मत होते. अबूलफजल, म्हणतो की, राजपद म्हणजे परमेश्वरापासून निर्माण झालेला प्रकाश, सूर्यापासून येणारे किरण आहेत. राजा हा ईश्वरी अंश आहे. ही हिंदूची कल्पना व राजाचे अधिकार ईश्वरीवरदान आहेत, ही युरोपीयन राष्ट्राची कल्पना यांचा संयोग अकबरकालीन मोगल राज्यव्यवस्थेमध्ये दिसतो. मोगल सम्राट सिंहासनारूढ होताना, राज्याभिषेक करून घेत असत. राज्याभिषेक दिवस राजधानीमध्ये साजरा होत असे. फक्त अकबराचा राज्याभिषेक पंजाबमधील गुरुदासपूर येथे झाला. राज्याभिषेकप्रसंगी नवे नाव किंवा बिरूद धारण करण्याची प्रथा होती, सलीमने जहांगीर, खुर्रमने शहाजहान, औरंगजेबने आलमगीर अशी नावे व बिरूद धारण केले.

**बादशहाची दिनचर्याः**

मोगल सम्राटाची दिनचर्या समकालीन साधनामधून आढळते. झरोकादर्शन, दिवान-इ-आम. घुसलखाना यासाठी बराच वेळ त्यांना द्यावा लागत असे. झरोका दर्शनाची पद्धत अकबराने सुरू केली. आग्रा किंवा दिल्ली येथे सम्राटाचा मुक्काम असेल या ठिकाणी प्रतिदिनी सकाळी बाले किल्ल्याच्या पूर्वेकडील तटाच्या दर्शनी खिडकीमध्ये सम्राट उपस्थित होत असे, त्यावेळी लोकाच्या तक्रारी, अडीअडचणी आणि समस्या समजावून घेत असे. संध्याकाळी झरोक्यातून प्राण्याच्या झुजी, दरवेश्याचे खेळ मनोरंजनाचे प्रकार बादशहा पहात असे. झरोका दर्शनानंतर दिवाण-इ-आम दरबार भरत असे. सम्राटाचा दरबार प्रवेश होते वेळी विशिष्ट प्रकारचे वाद्यसंगीत वाजवत असे. दिवान-इ-आम मध्ये मीर-इ-तुझक अर्ज-इ-मुकर्रर हे अधिकारी दरबाराची व्यवस्था पहात असत. प्रांतिक सुभेदार व इतर अधिकाऱ्यांच्या पत्रांचे वाचन, त्यावर विचार विनिमय होत असे, विशिष्ट प्रसंगी बादशहा नजराणे स्वीकारीत असे. ईंट, दसरा हा सण दिवाण-इ-आम मध्ये थाटाने साजरे होत असत. बाढदिवसासारख्या प्रप्सगी मोगल सम्राट सुवर्णतुला करीत असे. ही पद्धत हिंदुकडून उचलली होती. तर शुक्रबारी पालखीत बसून बादशहा जामा मशीदीमध्ये प्रार्थनेसाठी जात असे. झरोका दर्शन, बाधासगीत पद्धत औरंगजेबने बंद केली. त्यामुळे तो सकाळच्या वेळीही दिवाण-इ-आम मध्ये व्यतीत करीत असे.

विशिष्ट प्रकारचा आणि विशेष महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा करण्यासाठी घुसलखाना हा दरबार होता. दिवाण-इ-आम दरबार बरखास्त झाल्यावर हा दरबार भरत असे. अतिशय गुप्त व गंभीर स्वरूपाच्या प्रश्नावर चर्चा होत असल्यामुळे, महत्त्वाच्या व विश्वासातील अधिकाऱ्यांनाच या दरबारात प्रवेश होता. अनधिकृतपणे एखाद्याने प्रवेश केल्यास त्यास कडक शिक्षा होत असे. घुसलखान्यात प्रवेश करणाऱ्यावर नजर ठेवण्यासाठी एक खास अधिकारी असे. दिवाण-इ-आममध्ये एखाद्या विषयाची चर्चा अपूर्ण राहिली असल्यास व सम्राटाची सहमती असल्यास त्याची चर्चा होत असे. मोहिमेवर जाणाऱ्या लष्करी अधिकाऱ्याऱ्यांना महत्त्वाच्या सूचना या दरबारात दिल्या जात. प्रांतिय सुभेदारांना राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या सुचना बादशहा या दरबारातून देत असे. धार्मिक स्वरूपाच्या चर्चा केल्या जात असे. जहांगिरच्या काळात याचे रूपांतर मद्यखान्यामध्ये झाले.

दर बुधवारी सम्राट दिवाण-इ-आम या दरबाराचे रूपांतर न्यायालयात करीत असे. स्वतः श्रेष्ठ न्यायाधीश बनत. न्यायालयाचे अधिकारी महत्त्वाचे खटले सम्राटपुढे चालवत असे. रुढी, संकेत प्रमाणे बादशहा न्यायदान करीत

असे. श्री. दिल्लीश्वरी वा जगदीश्वरो म्हणून राजांची स्तुती केली जात असे. सरदारमंडळी राजवाड्या भोवती फेऱ्या मारून सलामी देत असे. त्याला तस्लीम किंवा कुर्निस असे म्हणत. श्री. एस. आर. शर्मा यांनी म्हटले की. "मोगलांनी शासनव्यवस्था अशा तन्हेने निर्माण केली होती की, ज्यामुळे ते भारतीय प्रजेचे चाहते बनले. मोगल सम्राटानी प्रजेशी निकटचा सबंध स्थापण्याचा प्रयत्न केला होता. प्रजेची गाऱ्हाणी ऐकून तिच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करीत असत. "

**२) केंद्रिय प्रशासनतील मत्रीमंडळ / अधिकारी:**

केंद्रिय प्रशासनामध्ये सम्राटाला मदत करण्यासाठी व कामकाजरराठी वेगवेगळे अधिकारी नेमलेले होते. सर्व अधिकारी सम्राटाला जबाबदार होते. त्यांचा निर्णय / सल्ला सम्राटाला बंधनकारक नव्हता, केंद्रिय शासनामध्ये ४ ते ६ प्रमुख अधिकारी होते. औरंगजेबच्या वेळी ८ अधिकारी होते. मोन्सर्टच्या मते कधी-कधी सम्राट अधिकाऱ्याच्या निर्णयानुसार आपला निर्णय बदलत असे. परतु अधिकारी सम्राटाला कोणती बाढ मान्य करण्यास तयार करत तसे, मोगल केंद्रिय प्रशासनात नऊ खाती प्रमुख होती. १) राष्ट्रीय उत्पन्न व महसूल २) शाही भावार ३) लष्कराचा खर्च आणि सैन्याचा पगार ४) दिवाणी व फौजदारी कायदा (५) धार्मिक बाबी ६) समाजाची नीतिमता ७) तोफखाना ८) टपाल व्यवस्था ९) चलन. या नऊ खात्यांचा कारभार संभाळण्यासाठी जबाबदार अधिकारी असे. हे अधिकारी लष्करी अमलदारही असे. मोगल प्रशासनाचा शिल्पकार अकबर हाच मानला जातो. केंद्रीय प्रशासनातील अधिकारी पुढील प्रमाणे-

**१) बजीर किंवा दिवाण:**

मोगल काळातील प्रधानमंत्र्याला बजीर, वकील, वकील-ए-आला किंवा वकील-ए-मुतलक इ. नावाने ओळखले जाते. सन्नाटानंतरचा सर्वात महत्त्वाचा अधिकारी असे. तो बित्त महसूल विभागाचा प्रमुख असे महसूल विभागाचा प्रमुख म्हणून त्याला दिवाण ही संज्ञा होती. अकबराच्या काळात पतप्रधानाला वकील ही संज्ञा होती. अर्थखाते संभाळणाऱ्या अधिकाऱ्याला वजीर म्हटले जात असे. अकबराच्या नंतर त्याला तोच अधिकार प्राप्त झाला. बादशहाच्या वतीने हुकूमनामे काढणे नवीन प्रदेशाची व्यवस्था लावणे, महसूल वसुलीच्या संदर्भात प्रांतीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे, प्रशासनावर लक्ष ठेवणे व सैनिक मोहिमेत सामिल होणे, जनकल्याणाचे कार्य करणे इ. कामे करावी लागत. बादशहाच्या दरबारात त्यास मान असे, घुसलखात्यातही प्रवेश असे. वजीरासाठी स्वतंत्र कचेरी व स्वतःचा शिक्का होता. बजीराच्या मदतीसाठी अकबराच्या काळात नायब दिवाण पद निर्माण करण्यात आले. पुढे नायड दिवाण ऐवजी दिवाण-इ-खालसा (शाही जमिनीचा अधिकारी) दिवाण-इ-तनखा (पगार अधिकारी) असे दोन अधिकारी दिवाणाला सहाय्यक म्हणून नेमण्यात आले. औरंगजेबच्या मृत्युनंतर दिवाण आपले अधिकार प्रभावीपणे गाजवू लागला.

**२) मीरबक्षी:**

मोगल प्रशासनामध्ये मीरबक्षी हा सैन्यमंत्री होता. मनसबदारांच्या पगाराची पत्रके तयार करणारा व वाटपाची व्यवस्था करणारा अधिकारी होय. त्याचे प्रमुख कार्य सैनिक भरती करणे, त्याच्या परीक्षा घेणे, सैनिकाची यादी सम्राटाला देणे, घोड्यांची पहाणी करणे, शाट्टी महालाच्या सुरक्षतेसाठी पहारेकरी नियुक्त करणे, युद्धात सैन्याचे नेतृत्व करणे, किल्ल्याचे रक्षण करणे सैनिकी अधिकाऱ्याचे वेतन देणे, मनसबदारांचे संघटन टिकरण, कामात कुचराई केल्यास मनसबदाराला समज देणे, युद्ध मोहिमांचा आराखडा तयार करून अधिकाऱ्याकडून घेणे व सम्राटाची मान्यता मिळवणे, सैन्याला सर्वप्रकारची मदत पुरवणे इ कामे करावी लागत असे. राजधानीच्या बाहेरील सर्व अखबारनवीस । (वार्ताहर). राजधानीतील तोफखान्याचे अधिकारी, गजदलाचे प्रमुख, लढाऊ नौकांचे प्रमुख हे सर्व मीरबक्षीच्या नियत्रणाखाली असत. मीरबक्षीला स्वतंत्र कचेरी होती, मोहिमेवर बादशहा असेल तर मीरबक्षीस मोहिमेबर जावे लागत असे.

**३) खान-इ-सामा / खानेसामान / मीर सामानः**

शाही भांडारगाराचा प्रमुख म्हणजे खाने सामा होय. राजवाड्याला लागणाऱ्या सर्व वस्तुची देखभाल व तरतुद करण्याचे काम त्याच्याकडे होते, सम्राटाकडून अमीर-उमराबाना जी बक्षिस दिले जाते त्याची निवड करणे, शाट्टी इमारत, उद्याने, कारखाने, शिकारखाने यावर नियंत्रण ठेवणे, व्यापार-उद्योगधंदे या खात्याचा कारभार साभाळणे. उत्पादित वस्तूचा प्रचार करून, परदेशी व्यापार वाढवणे, व्यापार वाढीसाठी दळणवळणाच्या सोयी करणे, रस्ते वाहतूक योग्य प्रकारे चालवणे इ. कामे कराबी लागत. त्याच्या मदतीसाठी दिवाण-इ-बयुतत नावाचा अधिकारी असे.

**४) सद्र-उस-सूद्रः**

मोगल काळातील न्यायखात्याचा प्रमुख व धर्मार्थ विभागाचा प्रधान होता. त्याला सदरे जहाँ किंवा सदरे कुल असे म्हणतात. हा बादशहाचा मुफ्ती किंवा कायदेपदित होता. राज्याच्या धार्मिक बाबी त्याच्याकडे होत्या, त्याचे प्रमुख कार्य इस्लामी शिकवणीचा प्रसार करणे, मुस्लिम विद्वान, सुफियो, विद्यार्थ्यांना अनुदान देणे, सम्राट अन्य अधिकाऱ्यांना कुरणाच्या नियमाचे पालन करण्यास लावणे, धर्म, दान संदर्भात सम्राटाला सल्ला देणे, प्रांतीय सदरच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे.

साम्राज्यातील सर्व काझी, मुफ्ती, मुहतसीब आणि जिझिया कर वसूल करणारे अधिकारी याच्यावर नियंत्रण ठेवणे, न्यायधिशाच्या नेमणुका करणे इनाम जमिन देताना बादशहाला सल्ला देणे, धर्मादाय देणग्या देताना बादशहा सदरशी चर्चा करत असे. अकबराने प्रत्येक प्रांतासाठी स्वतंत्र सदर नेमण्याचा प्रघात सुरू केला, सदरला स्वतंत्र कचेरी होती. तो महत्त्वाच्या खटल्याचा न्याय निवाडा करत असे.

**५) मुहतसीब :**

समाजाच्या नीतितत्वानुसार दर्जा राखण्याचे कार्य मुहतसीद्र या अधिकाऱ्याला करावे लागत असे. इस्लामी नीतितत्वानुसार मुस्लीम जनतेचे वर्तन असावे, यासाठी हा अधिकारी कार्यतत्पर राहत असे. कुराणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्याला दंड करत असे. रमजानचे उपवास, ईदची प्रार्थना यावर देखरेख करत असे. दारूचे अड्डे कुंटणखाने यावर धाडी घालून प्रतिबंधात्मक उपाययोजना करत असे. राजधानीच्या शहरातील मशिदी, दर्ग मावर देखरेख करत असे. औरंगजेबच्या काळात नीतिनियमामध्ये कडवेपणा जास्त आला व वाद्यासंगीत निषिद्ध, दाढीचा आकार प्रमाणात असावा, व्यापाप्यावर लक्ष ठेवणे इ. कामे करत असे. डॉ. ए. एल. श्रीवास्तवच्या मते "मुहतसिबचे काम म्हणजे शराब, भांग, मादक द्रव्ये पिणे, जुगार खेळणे यापासून समाजाला रोखणे. तो मुसलमानांना दंड करत असे की. जो इस्लाम धर्माच्या विरोधात विचार करतो. पैंगबरावर अविश्वास दाखवतो आणि पाच वेळा नमाज व रोजाचा त्याग करतो.

**६) बयुततः**

मरण पावलेल्या व्यक्तीची स्थावर व जंगम मालमत्ता मोजण्याचे व नोंदपत्रक करण्याचे काम उयुतत हा अधिकारी करत असे. मालमत्तेच्या मोजणीनंतर सरकारची थकबाकी बसुल करून, उरलेली मालमत्ता कायदशीर वारसाकडे सुपूर्त करणे, शाही कारखान्याच्या आवश्यक लागणाप्या वस्त पुरवठा करणे,

**७) मीर आतिश :**

मीरबक्षीच्या नियंत्रणाखाली तोफखान्याची व्यवस्था पहाणारा अधिकारी म्हणजे मीरआतिश होय. तोफखान्याला विशेष महत्त्व असल्याने स्वतंत्र खाते व अधिकारी नेमण्यात आला. राजधानीच्या तटबंदी व बालेकिल्ल्याच्या संरक्षणासाठी तोफाची रचना व व्यवस्था करण्याचे काम करावे लागत असे. महत्त्वाच्या मोहिमांच्या प्रसंगी मीर आतिश हजर असे.

**८) दरोगा-इ-डाकः**

हा टपाल खात्याचा प्रमुख अधिकारी. टपालांची जलदगतीने वाहातूक करण्यासाठी खास नोकरबर्ग नेमण्यात आला होता. वहातूकीसाठी घोड्यांचा उपयोग करण्यात येत असे. विशिष्ट अंतरावर डाकचौक्य स्थापन केलेल्या असे.

**९) मीर बहरीः** महसूल खात्याचा चिटणीस होता,

**१०) मीर-ए-बहरः**

हा जलसेनेचा प्रधान अधिकारी होता, शाट्टी नौकाचे देखभाल करणे, त्याचे प्रमुख कार्य होते.

**११) मुस्तौफीः**

हिशोब तपासणीचे काम करत असत. राज्याच्या उत्पानाचे आय-व्ययचा निरिक्षक होता.

**१२) मीर अर्जः**

बादशहापुढे विनंतीसाठी पाठविणाऱ्या अर्जाचा पाहणी करणारा अधिकारी होय.

**१३) मीर-ए-बर्रः**

जंगलाचा अधिकारी होता.

**१४) वाकिया-नवीसः**

हा शाही दरबाराचा वृत्तलेखक होता. हा राज्यातील सर्व बातम्या केंद्र प्रशासनाला अवगत करत होता. मोगल काळातील केंद्रिय प्रशासनाची प्रशसा करताना फादर मानसरेटने लिहिले आहे की, 'बादशहाचे सरकारी अधिकारी आणि न्यायाकडे कार्य विशेष लक्ष होते. तथापि कोणत्याही कर्मचाऱ्याऱ्यांनी चुका किंवा दुर्व्यवहार करताच त्याला गंभीर शिक्षा दिली जात." मुजूमदार, रायचौधरी यांच्या मते "आधुनिक अर्थाने मोगल प्रशासनामध्ये कोणीही मंत्री नव्हते. मंत्री न म्हणता त्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. ते संपूर्ण सम्राटाच्या इच्छावर अवलंबून होते. की, त्याचा निर्णय स्वीकारणे की न स्वीकारणे."

**प्रांतिक शासन व्यवस्था**

बाबराने मोगल सत्तेची स्थापना करून, वेळेप्रसंगी सुलतान शाहीच्या काळातील प्रांतिय शासन व्यवस्था कायम ठेवली. हुमायूननेही त्यात कोणताही बदल केला नाही. शेरशहाने प्रांतिक शासनव्यस्थेत चांगले बदल केले. त्याच्या सुरी घराण्याचा शेवट झाल्यावर पुन्हा जुनी प्रांतिक शासन व्यवस्था सुरू करण्यात आली. अकबराने प्रांतिक शासन व्यवस्थेला नवा आकार व दिशा दिली. त्यामध्ये अकबराने राज्य विस्तार वाढवून साम्राज्याचे पारा भाग केले. त्याबर प्रांतिक सुभेदर नेमले. अकबराच्या काळात १५, जहांगीराच्या काळात १७. शहाजहानच्या काळात १२ आणि औरंगजेबाच्या काळात २१ प्रांताची संख्या होती. प्रांतीय प्रशासनात्तील प्रमुख अधिकारी पुढीलप्रमाणे-

**१) सुभेदारः**

उत्तर भारतामध्ये प्रत्येक सुभ्यावर / प्रांतावर स्वतंत्र सुभेदार नेमण्याचे धोरण अकबराने स्वीकारले. ज्या सुभेदाराकडे एकापेक्षा जास्त प्रात असतील, त्याच्या मदतीसाठी नायब नेमण्यात आला, प्रांताच्या / सुभ्याचा प्रमुख अधिकारी म्हणजे सुभेदार होय. त्याला साहिब- इ-सुमा किंवा नाहीम / नाजिम किंवा सिपहसालर असे म्हणतात. शांतता, सुव्यवस्था राखण्यासाठी जबाबदारी त्याच्यावर होती. तो सम्राटाला प्रत्यक्ष जबाबदार होता. मुलकी व लष्करी दोन्ही प्रकारचे अधिकार त्याला पार पाडावी लागत असे. बंडाचा बिमोड करणे. माडलिकाकडून खडणी वसूल करणे, न्यायदान करणे,

व्यापार उद्योगाचा बिकास करणे, लोकांचे कल्याण करणे, शेतसारा एकत्रीत करणे, इ. कामे त्याला करावी लागत असे. त्यास बादशहाच्या परवानगी शिवाय युद्ध, तह करता येत नसे. तो प्रांतिय राजधानीत डामडौलत राहत असे. त्याच्या कचेरीचे स्वरूप राजवाड्यासारखे होते. युरोपीयन प्रबासी लिहितात की. "मोगल सुभेदारांच्या कचेऱ्या युरोपातील राजांच्या दरबारापेक्षा भपकेबाज असत. सुभेदार हा एक मनसबदार होता. डॉ. ए. एल. श्रीवास्तवच्या मते, 'सुभेदाराला सुचना दिली जात असे. की सैन्य सुसज्ज ठेवणे सताना मदत व शेतकप्याचे रक्षण करणे, शेतीच्या प्रगतीमध्ये कार्य करणे. त्याचे प्रमुख कार्य म्हणजे आपल्या क्षेत्रातील महसूल गोळा करणे.

**२) दिवाणः**

प्रत्येक प्रांतासाठी दिवाण हा वित्त विभागाचा प्रमुख असे. त्याची नेमणूक केंद्रिय दिवाणाच्या सुचनेनुसार सम्राटाकडून होत असे. केंद्रिय दिवाणाच्या सुचनेनुसार काम करावे लागते. प्रांताचा महसूल गोळा करणे, शेतसारा ठरवणे, तो गोळा करणे, विक्रीवर अबकारी कर, रहदारी कर इ. सरकारी कर गोळा करणे, हिशोब ठेवणे. शेती लागवडी खाली आणणे, उत्पन्न वाढवणे, तगई कर्ज वसूल करणे, कामचुकार अमीलाना समज देणे, आपल्या काचा अहवाल केंद्रिय दिवाणाला देणे. इ. कामे करावी लागत असे. अनेकवेळा सुभेदार-दिवाण याच्या वाद होत असे. आर्शदखानाला १६६५ मध्ये काबूलच्या दिवाणपदाबरोबर नायब सुभेदारचे पदट्टी दिले.

**३) बक्षी:**

केंद्रिय मीर बक्षीच्या सुचनेनुसार बादशहाकडून प्रातिय बक्षीची नेमणूक होत असे. सुभेदाराच्या प्रत्यक्ष बर्चस्वाखाली काम करत असे. प्रांतातील लष्करभरती, शिस्त, पगार वाटप, अश्वदल, पायदळाची पाहणी करणे, इ. त्याला कामे करावी लागत. युद्ध मोहिमावर जाणे. त्याला त्याची माहिती केंद्राला पाठवणे अनिवार्य होते.

**४) दिवाण-इ-बयुततः**

प्रांतामध्ये सरकारी इमारतींची देखभाल करण्यासाठी दिवाण-इ-बयुतत हा अधिकारी असे. राजरस्ते. शाही इमारती, सार्वजनिक इमारती, सरकारी कचेऱ्या, उद्याने यांची पहाणी करणे, त्यातील दुरूस्ती व नवीन बाधकामाची योजना तयार करणे. इ. कामे दिवाण-इ-बयुततला करावे लागत असे. बादशहाने प्रांताला भेट दिली तर त्याची सरभराई करण्याची जबाबदारी पार पाडावी लागत असे.

**५) सदर व काजी:**

सदर हा धर्म विभागाचा प्रमुख असून, केंद्रिय सदरच्या सुचनेनुसार सम्राटामार्फत त्याची नेमणूक केली जात असे. त्याच्यावर सुभेदार, दिवाण यांचे नियंत्रण नसे. केंद्रिय सदर प्रमाणेच त्याचे कार्य असे धार्मिक व सार्वजनिक कारणासाठी दान किंवा इनाम दिलेल्या जमिनीची देखभाल करण्याचे काम सदरला करावे लागत. प्राप्तीय काझी, व मीर आदिल हे त्यांच्या नियंत्रणाखाली कार्य करीत असे. सदरला स्वतःची कचेरी असे. धार्मिक कारणासाठी जमिनी इनाम देण्याचा अधिकार होता. काजी हा न्याय विभागाचा प्रमुख होता. त्यो कार्य फौजदारी खटल्याचा निर्णय करणे, आपल्या नियंत्रणाखाली काजीच्या कार्याच निरिक्षण करणे.

**(६) कोतवालः**

प्रांताची राजधानी मोठी व महत्त्वाची शहरे येथील प्रमुख अधिकारी म्हणजे कोतवाल होय. ऐन-अकबरी या ग्रंथामध्ये कोतवालाच्या कार्याचा तपशील दिलेला आहे. त्याची नेमणूक केंद्राकडून होत असे. तो नगराचा प्रमुख पोलिस अधिकारी होता. शहरात शांतता सुरक्षितता राखणे, रात्री दक्षता पथक घेऊन शहरातून फेरफटका मारणे, शहरातील घरे, इमारती माच्या नोंदी ठेवणे. बाजारातील वजन मापाची पाहाणी करणे, बेवारशी नागरिकाच्या मालमतेची मोजदाद करण्याची व्यवस्था करणे, लहान-मोठ्या गुन्ह्यांची चौकशी करणे. तुरुंगाची व्यवस्था पाहाणे इ. कामे त्याला करावी

लागत असे. शहरातील गुप्तहेर त्याच्या निमंत्रणाखाली काम करीत असत. त्याच्यासाठी स्वतंत्र कचेरी असे. हुशार, चाणाक्ष व अनुभवी माणसाची कोतवाल पदावर नेमणूक होत असे. अबुल फजलच्या मते "या पदासाठी अगदी योग्य व्यक्ती नेमली जात असे ती ताकदबान, हुशार, अनुभवी, क्रियाशील, धूर्त व परोपकारी असे.

**७) वाकिया-नवीसः**

यांच्याकडे प्रांतातील पत्रव्यवहार व गुप्तहेर विभागाची जबाबदारी असे. सर्व शासकीय पत्रव्यवहार तो सांभाळत असे. हेराकडून प्राप्त झालेली माहितीचा अहवाल बादशहाकडे पाठवणे, हेर व बातमीव्दारांच्या नेमणुका करणे. इत्यादी महत्त्वाचे कार्य त्यास पार पाडावे लागत.

**८) अमीलः**

प्रांताचा महसूल वसूल करणारा अधिकारी म्हणजे अमील होय. हाताखालील अधिकाऱ्यांच्या मदतीने सर्व महसूल वसूल करणे. त्याचा हिशोब ठेवणे, पडिक जमिनी लागवडीखाली आणणे, शेतजमिन मोजणी करणे. इ. काम करीत असे. मुकादम व पटवारी हा महसूल अधिकाऱ्याजवळच्या वह्या तपासण्याचा अधिकार त्याला होता, सर्व कामाचा अहवाल केंद्राकडे महिन्यात पाठवणे, त्यास बंधनकारक होते.

**९) ठाणेदारः**

प्रांतात लष्करी महत्त्वाच्या ठिकाणी ठाणेदार अधिकारी असे. त्याच्यावर बादशहाचे निमंत्रण होते. बर्नियरच्या मते, प्रातिय शासक बड़े असून अत्याचारी बनले होते. त्याच्या विरुद्ध प्रजा तक्रार करू शकत नव्हती. 'डॉ.ए.एल. श्रीवास्तव लिहितात की. औपगजेब कठोर व योग्य शासक होता तरीपण, प्रांतिय शासन व्यवस्था अस्तव्यस्त होती. कारण २५ वर्ष तो दक्षिण भारतात लढत होता. त्यामुळे मध्यवर्ती शासन व्यवस्था कमजोर बनली होती.

**स्थानिक प्रशासन व्यवस्था**

मोगल काळात स्थानिक प्रशासन व्यवस्थेमध्ये सरकार (जिल्हा) तहसील (परगण) आणि मौजा (ग्राम) हे तीन विभाग येतात. त्या प्रत्येक विभागावर स्वतंत्र अधिकारी असत.

**अ) सरकार किंवा जिल्हा प्रशासनः**

प्रांताचे विभाजन जिल्हा किंवा सरकारमध्ये केलेले होते. अकबराच्या काळात १०५ जिल्हे होते. शिकदार, अमलगुजार, बितिकची, पोतदार इ. अधिकारी होते.

**१) शिकदार किंवा फौजदारः**

हा जिल्ह्याचा प्रमुख अधिकारी असे, त्यास जिल्हाधिकारी म्हणत. प्रांतिक सुभेदाराचा महत्त्वाचा सहाय्यक होता. जिल्ह्यामध्ये शांतता व सुरक्षितता राखणे, सम्राटाचे आदेश लागू करणे, सारा बसुलीसाठी मदत करणे. इ. कामे करीत असे. चोर, दरोडेखोर, लुटारू व इंडखोर यांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी त्याच्याकडे होती. त्याच्या जवळ संन्याची छोटीशी तुकडी असे. रस्त्यांची पाहणी करून दुरूस्ती करणे. जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणांना अचानक भेटी देऊन पाहणी करणे. अधिकाऱ्याना मार्गदर्शन करणे.

**२) अमलगुजार :**

जिल्ह्यातील महत्त्वाचा दुसरा अधिकारी होय. तो अर्थ विभागाचा प्रमुख होता. जमीन महसूल गोळा करणे, शेतीस उत्तेजन देण, जिल्ह्याचा जमाखर्चाचा हिशेब ठेवणे, त्याचा अहवाल प्रांतिक दिवाणाकडे पाठवणे इ. कामे करावी

लागत असे. राज्याचे सरकारी उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न करणे. दुष्काळ व इतर नैसर्गिक आपत्तीत तो शेतकऱ्यांना "तनवी" कर्ज शासनामार्फत देत असे.

**३) वितिकची / बितिक्ती:**

वितिकची म्हणजे लेखपाल होय. तो जिल्हा ऑफिसचा सुपरिटेडच होता. जिल्ह्याचे दप्तर साभाळण्याचे त्याचे काम होते, अमलगुजार मदत करणे. जिल्ह्यातील पटवारी, कानुनगो, मुकादम, करगोळा करणारे अधिकारी यांची नोकरी विषयक नोंदवही ठेवून त्याच्या कामावर लक्ष ठेवणे, त्यांचे पगार देणे.

**४) पोतदर (खजिनदार) :**

हा जिल्ह्यातील ट्रेझरी ऑफिसर (कोषाधिकारी) होता. तो अमलगुजारच्या आज्ञेप्रमाणे काम करीत असे. अमलगुजार व्यक्तीशः सरकारी तिजोरीला जबाबदार असत. या तिजोरीच्या दोन चाव्या असत. एक पोतदाराकडे व दुसरी अंमल गुजाराकडे असे. पोलदार आवश्यक लागणारा पैसा ठेवून, बाकीचा सर्व पैसा केंद्रसरकाराकडे पाठवून देत असे. शेतकऱ्यांकडून शेतसारा जमा जरून, त्यांना पावती देणे व शेती सबंधीच्या सर्व नोंदी ठेवण्याचे काम करत असे. आवक व खर्चाचे तपशील यांची नोंद ठेवणे. त्याच्या मदतीसाठी अनेक छोटे-छोटे अधिकारी होते.

**ब) परगणा किंवा महाल (तालुका) प्रशासनः**

जिल्ह्याचे विभाजन तालुक्यामध्ये केले जात असे. एका जिल्ह्यात ४५ तालुके असत. प्रत्येक तालुक्यात जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्या प्रमाणेच अधिकारी नेमलेले होते. ते अधिकारी म्हणजे शिकदार (तहसीलदार), अमील, पोतदार, कानूनगो इ. अधिकारी होते.

१) **शिकदार (तहसीलदार):** तहसीलदार मुख्य अधिकारी असे. जिल्ह्यातील फौजदाराप्रमाणे त्याचे सर्व कार्य तालुक्यात असे.

२) **अमील** तालुक्याच्या महसूल विभागाचा प्रमुख होता. शेतसारा ठरवणे, वसूल करणे, कामकाजाची तपासणी व पाहणी करणे. कर न देणाऱ्याला दड ठरवणे. दिवाणी न्यायालयाचे कामकाज पहाणे.

३) **पोतदार** हा तालुक्याचा खजिनदार असे. वसूल झालेला महसूल व्यवस्थीत ठेवणे. तालुक्याचा खजिना संभाळणे,

४) **कानूनगो** हा पटवारीचा प्रमुख होता. त्यांचे कार्य शेती अधिकाऱ्याप्रमाणे होते. तालुक्यातील जमीन, पीक, महसूल यांची माहिती तो ठेवीत असे.

५) **कारकून** तालुक्याचे सर्व रेकॉर्ड संभाळणे, यासाठी दोन कारकून असे.

क) **मौजा** / ग्राम प्रशासनः

परगण्याचे अनेक गावात विभाजन केलेले असे. गाब हे सर्वात लहान घटक असे. प्रत्येक गावात तेथील लोकांची पंचायत असे. या पंचायतीत गावातील वडीलधारी, अनुभवी, ज्ञानी व्यक्ती असे. प्रत्येक पंचायत स्वायत असे. गावातील प्रशासन, न्यायदान, शांतता, सुव्यवस्था, स्वच्छता, शिक्षा इ. कामे पंचायत करत असे. सरकारमार्फत पटवारी, चौकीदार / मुकादम, इ. दुय्यम अधिकारी प्रशासन पाहत असे. डॉ. पी. सरनच्या मते, "गावातील भांडणाचा निर्णय पंचायत करत असे. त्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील करण्याची गरज कमी होती. मोगल सरकारसुद्धा पंचायतीच्या निर्णयाचा आदर राखत असे, मुकादमाचे कार्य देखभाल करणे, पटवारीचे कार्य शेतसारा वसूल करणे. चौधरीचे कार्य पंचायतीच्या मदतीने न्यायदान करणे. चौकीदाराचे कार्य गावाची सुरक्षा राखणे.

मोगल काळात मध्यवर्ती सत्ता प्रढळ असल्याने प्रांतिय व स्थानिक सत्तेवर नियंत्रण होते. प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्याच्या दोन किंवा तीन वर्षांनी बदली होत असे. बंडखोर सुभेदारांना बादशहा शासन करीत असे. महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका बादशहा करत असे. बादशहाने सर्वत्र गुप्तहेर नेमलेले असे. ती सर्व माहिती सम्राटाला कळवत असे. मोगल प्रशासनात एक साखळी असल्याने सर्व प्रशासनात सुसूत्रता निर्माण झाली होती.

**मोगल काळातील महसुल कर व्यवस्था**

मोगल साम्राज्याचे एकूण उत्पन्न प्रत्येक सम्राटाच्या काळात भिन्न होते. अकबराच्या एकूण उत्पन्न १३.५ कोटी रूपये होते. शहाजहानच्या काळात २२.५ कोटी रुपये होते. औरंगजेबच्या काळात ३८ कोटी इ. रूपये होते. मोगल राज्यव्यवस्थेमध्ये अर्थ खात्याचा प्रमुख दिवाण-इ-अला नावाचा अधिकारी असे. शेती महसूलचा हा प्रमुख होता. त्याशिवाय मुसलमानाना जकात नावाचा कर द्यावा लागत असे. या कराचे उत्पन्न धार्मिक कारणाराठी खर्च करण्यात येई. जिझिया कर हिंदूवर लावला. मीठ, नीळ यांच्या व्यापारापासून चांगले उत्पन्न मिळत असे. मोगल काळात दोन प्रकारे उत्पन्न मिळत असे. केद्रिय कर व स्थानिक कर असे. व्यापार, खाणी, चुंगी, मीठ, शेती यात्राकर यावर केंद्र सरकार कर लावत, याशिवाय परराज्याकडून खंडण्या युद्धातील लुट, सम्राटाला देणग्या, नष्ट झालेल्या जहागिरी, मनसबदारी यांचे उत्पन्न मिळत असे. उत्पन्नाचा बराच भाग लष्करी व्यवस्थेसाठी खर्च होत असे. मनसबदार, सरकारी अधिकाऱ्याचे पगार हा खर्चाचा प्रमुख बाठा होता. शाही इमारती, रस्ते, उद्याने, सराया, किल्ले याचे बाधकाम यासाठी प्रचंड पैसा खर्च होत असे. शेतकऱ्याच्या सोयीसाठी तलाव, पाटबंधारे यांच्या योजना असे.

मोगल काळात चलनपद्धतीत सुधारणा करणारे दोन राज्यकर्ते झाले. ते म्हणजे शेरशहा व अकबर होय. शेरशाही चलन पद्धतीमध्ये एकसूत्रीपणा व सोपेपणा आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शेरशहाने १८०ग्रेन वजनाचे व १७५ ग्रेन शुद्ध चादी असलेली रुपया हे नाणे सुरू केले. अनेक ठिकाणी सरकारी नियन्त्रित टांकसाळ्या सुरू केल्या. अकबराने चलन व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल केला, ख्वाजा अब्दुल समद याला अकबराने दिल्लीच्या केंद्रिय टाकसाळीचा प्रमुख नेमला. प्रांतिक टांकसाळी सुरू करून, विश्वासू अधिकारी प्रत्येक प्रांतासाठी नियुक्त केला. बंगाल, लाहोर, जौनपूर, पाटणा, अहमदाबाद येथे प्रांतिक टांकसाळ्या स्थापन केल्या. १७२.५ग्रेन वजनाचा ताब्याचा दाम, किया, पैसा हे सर्वात लहान नाणे होते. ४० दामांचा एक रूपया मानला जात असे. शहाजहानच्या काळात सुरतेला एक टाकसाळ उघडण्यात आली. सुलतानशाहीच्या तुलनेने मोगल काळात चलन व्यवस्थेत जास्त सुधारणा झालेली होती.

**मोगल काळातील न्याय व्यवस्था**

मोगल कालखडात न्यायदान प्रक्रिया अतिशय महत्त्वाची होती. सुलतानशाहीच्या काळात असलेली इस्लामी विधिनियमाची उत्पत्ति, साधने मोगल काळात देखील होती. भारतात मोगलांची तीन प्रकारची न्यायालय होती.

**अ) न्यायालयाचे प्रकार :**

**१) धार्मिक कायदेविषयक न्यायालयः**

या न्यायालयाचे कामकाज काझी पहात असे. त्याला काझी-उल-कझत म्हणत असे. काझी शरियत किंवा धार्मिक कायद्यानुसार न्यायदान करत असे. धार्मिक संस्था, कुटुंबकायदा, बारसा कायदा असा फक्त धर्मशास्त्राशी संबंधित किंवा धार्मिक अभियोगांचा न्यायनिवाडा करत असे. ही न्यायालय मराठेकालीन धर्मसभेसारखी होती. कनिष्ठ न्यायालयाकडून आलेल्या अपीलबरहुकूम न्याय देत असे.

**२) सामान्य कायदेविषयक न्यायालयः** यामध्ये प्रांतिक व स्थानिक स्वरूपाची न्यायालय होती, सामान्य कायद्या न्यायालयात रितीप्रमाणे किंवा अलिखित कायदेसंहितानुसार न्यायदान करण्यात मेई. ज्याना अशा अलिखित कायद्या

संबंधीचे बरेचसे ज्ञान असे, त्यांना या न्यायालयात समावेश करण्यात येई. सर्व न्यायालय स्वतंत्रपणे कार्य करीत होती.

**अ) प्रांतिय न्यायालये:**

प्राताच्या ठिकाणी न्यायालय असे. फौजदारी खटल्याचे निर्णय राज्यपाल / सिपाहसालर घेत असे. तर नागरी खटल्याचे (जमिनी प्रकरणी किंवा मालमत्ता बगैरे) प्रकरणी दिवाण निर्णय देत असे. प्रांतिय न्यायालयाची जबाबदारी काझीकडे असे. त्याच्या मदतीला मुफ्ती व मिरही हे अधिकारी असत.

**ब) परगणा न्यायालये:**

परगण्याच्या ठिकाणी परगणा कामी आणि कोतवाल हे न्यायदानाचे काम पहात. फौजदार आणि अंमलगुजार यांनाही फौजदारी प्रकारणाचा न्याय देण्याचा अधिकार होता. शिकदार हा मॅजिस्ट्रेटचे काम करी. तो फौजदारी खटल्याचे निकाल देत असे. नागरी न्यायनिवाड्याचे काम अमील करीत असे.

**क) ग्राम (मौजा) न्यायदान:**

खेड्यातील न्यायदानाचे कार्य पंचायत करीत असे. पचायतील गावातील श्रेष्ठ, निस्वार्थी, जबाबदार ज्येष्ठ नागरिक सभासद असत. गावातील तंटे गावातच मिटवले जात. अशाप्रकारे ग्रामातील न्यायव्यवस्था स्वायत्त होती.

**३) राजकीय कायदे विषयक न्यायालय:**

राज्य आणि कायदा व सुव्यवस्था यांच्या विरूद्ध केलेल्या गुन्ह्यांच्या बाबतीत न्यायनिवाडा होत असे. या गुन्ह्यात बंड, विश्वासघात, चोरी, राजमार्गावरील दरोडा आणि खून यांचा समावेश असे. जेथे वापरण्यात येणाऱ्या विधिनियमाला उर्फ म्हणत. साधारणपणे उर्फचा अर्थ अलिखित कायदा होत असून, त्याचा वापर विविध प्रकारच्या राजकीय कायद्याच्या न्यायदानासाठी किंवा त्वरीत निर्णयासाठी असलेला बिधि नियम म्हणून करण्यात येऊ लागला. राजकीय कायदेविषयक न्यायालयातील न्यायदान स्वतः बादशहा करत असे. लोकांचे आलेले अर्ज बादशहासमोर सादर करण्याचे काम मीर अरक्ष नावाचा अधिकारी करत असे.

**ब) इस्लामी कायदेशास्त्राने मान्यता दिलेले गुन्हे:**

इस्लामी कायदेशास्त्राने तीन प्रकारच्या गुन्ह्याना मान्यता दिली. ते म्हणजे परमेश्वराविरूद्ध केलेले गुन्हे, राज्याविरूद्ध केलेले गुन्हे व सामान्य व्यक्तीच्याविरूद्ध केलेले गुन्हे. परमेश्वरा विरूद्ध केलेला गुन्हा. या गुन्हेगाराला शिक्षा करण्याचा अधिकार फक्त परमेश्वराला होता. म्हणून अशा बाबतीत काझी धार्मिक कायद्यानुसार न्यायदान करीत. राज्याविरूद्ध गुन्हे म्हणजे ढंड, दंगेधोपे करणाऱ्या गुन्हेगारांना राज्याचा न्यायधीश न्यायदान करीत असे. सामान्य व्यक्तीच्याविरूद्ध केलेले गुन्ह्यांतील गुन्हेगाराला सरकारकडून शिक्षा होत असे.

**अ) प्रांतिय न्यायालये:**

प्राताच्या ठिकाणी न्यायालय असे. फौजदारी खटल्याचे निर्णय राज्यपाल / सिपाहसालर घेत असे. तर नागरी खटल्याचे (जमिनी प्रकरणी किंवा मालमत्ता बगैरे) प्रकरणी दिवाण निर्णय देत असे. प्रांतिय न्यायालयाची जबाबदारी काझीकडे असे. त्याच्या मदतीला मुफ्ती व मिरही हे अधिकारी असत.

**ब) परगणा न्यायालये:**परगण्याच्या ठिकाणी परगणा कामी आणि कोतवाल हे न्यायदानाचे काम पहात. फौजदार आणि अंमलगुजार यांनाही फौजदारी प्रकारणाचा न्याय देण्याचा अधिकार होता. शिकदार हा मॅजिस्ट्रेटचे काम करी. तो फौजदारी खटल्याचे निकाल देत असे. नागरी न्यायनिवाड्याचे काम अमील करीत असे.

**क) ग्राम (मौजा) न्यायदानः**

खेड्यातील न्यायदानाचे कार्य पंचायत करीत असे. पचायतील गावातील श्रेष्ठ, निस्वार्थी, जबाबदार ज्येष्ठ नागरिक सभासद असत. गावातील तंटे गावातच मिटवले जात. अशाप्रकारे ग्रामातील न्यायव्यवस्था स्वायत्त होती.

**३) राजकीय कायदे विषयक न्यायालयः**

राज्य आणि कायदा व सुव्यवस्था यांच्या विरूद्ध केलेल्या गुन्ह्यांच्या बाबतीत न्यायनिवाडा होत असे. या गुन्ह्यात बंड, विश्वासघात, चोरी, राजमार्गावरील दरोडा आणि खून यांचा समावेश असे. जेथे वापरण्यात येणाऱ्या विधिनियमाला उर्फ म्हणत. साधारणपणे उर्फचा अर्थ अलिखित कायदा होत असून, त्याचा वापर विविध प्रकारच्या राजकीय कायद्याच्या न्यायदानासाठी किंवा त्वरीत निर्णयासाठी असलेला बिधि नियम म्हणून करण्यात येऊ लागला. राजकीय कायदेविषयक न्यायालयातील न्यायदान स्वतः बादशहा करत असे. लोकांचे आलेले अर्ज बादशहासमोर सादर करण्याचे काम मीर अरक्ष नावाचा अधिकारी करत असे.

**ब) इस्लामी कायदेशास्त्राने मान्यता दिलेले गुन्हेः**

इस्लामी कायदेशास्त्राने तीन प्रकारच्या गुन्ह्याना मान्यता दिली. ते म्हणजे परमेश्वराविरूद्ध केलेले गुन्हे, राज्याविरूद्ध केलेले गुन्हे व सामान्य व्यक्तीच्याविरूद्ध केलेले गुन्हे. परमेश्वरा विरूद्ध केलेला गुन्हा. या गुन्हेगाराला शिक्षा करण्याचा अधिकार फक्त परमेश्वराला होता. म्हणून अशा बाबतीत काझी धार्मिक कायद्यानुसार न्यायदान करीत. राज्याविरूद्ध गुन्हे म्हणजे ढंड, दंगेधोपे करणाऱ्या गुन्हेगारांना राज्याचा न्यायधीश न्यायदान करीत असे. सामान्य व्यक्तीच्याविरूद्ध केलेले गुन्ह्यांतील गुन्हेगाराला सरकारकडून शिक्षा होत असे.

सक्तीचे इस्लाम धर्म स्वीकारण्यास लावणे, सक्तीने सती जाण्यास लावणाऱ्याना शिक्षा करणे, अकबराने चुलत व मावस भावंडामधील विवाह. बालविवाह, बहुपत्नीत्व हे बेकायदेशीर ठरवले. औरगजेबने दिवाळी व होळी सण साजरा करणे, यमुना व साबरमती नद्याकाठी मृताना अग्निसंस्कार करणे, अमावस्या व एकादशी दिवशी दुकाने बंद ठेवणे इ. गुन्हे म्हणून जाहिर केले. काही आनंदाच्या प्रसगी कैद्याची सुटका करण्यात येत असे. राजांचा व राजपुत्रांचा वाढदिवस साजरा करताना, राजाचा प्रदीर्घ आजार बरा झाल्यास, सिंहासनारोहणाचा वार्षिक समारंभ करताना, तुरुगाला बादशहांनी भेट देण्याच्या प्रसंगी कैद्याची सुटका करत असे.

३) मोगल न्यायपद्धतीतील दोषः

१) न्यायदान प्रक्रियेत लिखित स्वरूपाचा कायदा अस्तित्वात नव्हता.

२) धार्मिक स्वरूपाची न्यायालये ही नियमितपणे भरत नसत.

३) न्यायालयाची सत्ता व हुकूमत याची निश्चिती करण्यात आली नव्हती.

४) न्याय सत्ता व कार्यकारी सत्ता यांच्या कामाचे पूर्णपणे विभाजन करण्यात आलेले नव्हते.

५) प्रशासन व न्यायसत्ता यांची सरमिसळ काही वेळा झालेली दिसते.

६) काझी कडून काही वेळा प्रष्ट्राचार होत असे.

७) गुन्हेगारांना भयंकर स्वरूपाच्या शिक्षा दिल्या जात असत.

आपली प्रगती तपासाः

१) मोगल काळातील शिक्षेचे स्वरूप सांगा.

**मोगल काळातील लष्करी प्रशासन**

मोगल काळात सैन्य संघटन अतिशय उत्तम होते. त्यांचे साम्राज्य लष्करी यंत्रणेच्या आधारावर उभारलेले होते. लष्कराचा सर्वश्रेष्ठ अधिकारी म्हणजे सम्राट होय. त्याच्या मदतीला अनेक अधिकारी होते. सैन्य विभागाचा प्रमुखास मीरबक्शी म्हणत असे. त्याच्या मदतीसाठी तीन बक्शी असे. मीर बक्शीचे काम सैनिकाची नियुक्ती व प्रशिक्षण, वेतन देने इ. होते.

**अ) मोगल सैन्याची / लष्कराची रचनाः**

**१) मोगलशाहीतील कनिष्ठ राज्यकर्त्याकडील सैन्यः**

मोगल काळात कनिष्ठ राज्यकर्त असत, त्यांच्याकडे स्वतःची फौज असे. बादशहाच्या आदेशानुसार फौज पाठवली जात असे.

**२) मनसबदारांचे सैन्यः**

बादशहा मनसबदाराची नेमणूक करत असे. त्याच्या जवळ सैन्य असे. त्याचे एकूण ३३ वर्ग असून जात व सवार या दोन प्रकारचे भेद होते. प्रचंड यश मिळवल्यावर त्यांना बढती

मिळत असे. उमराब, अमीर, उल उमराब, खान, खानान इ. प्रकारचे किताब मिळत असे.

**३) दाखिली सैन्यः**

बादशहाचे खास सैन्य असे. दाखिली सैन्यांच्या घोड्यांना जाग दिलेले असत. त्यावर राज्यसरकारचे नियंत्रण असे. त्यांना राज्यसरकार पगार देत असे. हे सरकारी किंवा शाही सैन्य म्हणून ओळखतात. मोहिमांच्या प्रसंगी मनसबदारी फौजेबरोबर रणांगणावर उत्तरत असे.

**४) आहाडी / अहदी सैन्यः**

प्रतिष्ठित नागरीकांचे व बडादशाही मान्यता असलेले सैन्यदल होते. यामध्ये प्रामुख्याने मुस्लिमांचा अधिक भरणा असे. ते एकप्रकारचे बादशहाचे अंगरक्षक असे. त्यांचा पगार केंद्र सरकारकडून होत असे.

**५) कुमकी / कायम सैन्यः**

बादशहा जवळ खास फौज असे. ते खास राखीव पथक होते. ते प्रत्यक्ष बादशहाच्या नियंत्रणाखाली असे. या सैन्यामध्ये हिंदुस्थानी मुसलमान, उझबेक, इराणी, तुराणी, तुर्की इ. परकीय मुसलमान सैन्य असे.

**ब) मोगल लष्कराचे विभागः**

मोगल लष्कराचे एकूण पाच विभाग होते. ते म्हणजे घोडदल, द्त्तीदल, पायदल, तोफखाना, आरमार

**१) घोडदळ सैन्यः**

मोगल लष्करातील अत्यंत महत्त्वाचा विभाग म्हणजे घोडदळ होय. घोडदळ हे मनसबदारी पद्धतीवर आधारीत होते. मोघल सैन्यात आशिया खंडातील प्रभावी घोडदळ होते. अकबराच्या काळात २५ हजार घोडदळ होते घोडेस्वारांना राज्यात बारगीर म्हणून ओळखत असे. घोडदळाचे दोन प्रकार होते. सरकारमार्फत घोडा व शस्त्रास्ने पुरवली जात व काहींचा स्वतःचे घोडे व शस्त्रास्त्रे असत. घोडदळातील सैन्याची विभागणी ही त्याच्या गुणवत्तेवर आधारित असे. एक घोडा असलेल्या सैनिकास एक अस्पा, दोन घोडे असलेल्या

सैनिकास दो अस्पा, व तीन व चार घोडे असलेल्या सैनिकास सेहअस्पा व चहर अस्पा म्हणत असत. दहाच्या मनसबदारास दहबशी असे म्हणत. त्याच्याकडे कमीत कमी १८ घोडे असते.

**२) हत्तीदलः**

मोगल लष्करात अनेक कारणाने हत्तीचा उपयोग करत असे. सेनापती हत्तीवर बसून संन्याची पाहणी करीत असे, शत्रूवर हल्ले करणे, किल्ल्याचे दरवाजे फोडणे, शत्रूला चिरडणे, मोहिमेच्यावेळी साहित्य वाहतूक करणे, युद्धात आघाडीवर लढण्यासाठी युद्धात बचावात्मक व आक्रमक चढाईचे प्रशिक्षण हत्तीला दिलेले असे. सैन्य रचनेतील पायदळाची फळी मोडण्यासाठी हत्तीचा उपयोग होत असे. हत्ती दलाची विभागणी सात श्रेणी होती. त्यांच्या दर्जानुसार मानधन मिळत असे. हत्ती, तोफखान्यास घाबरत व संराबैरा धावत असत.

**३) पायदळ सैन्यः**

मोगल लष्करातील पायदल हा प्रमुख विभाग होता. याच्या समोरासमोर जमिनीवर शत्रूशी मुद्ध होत असे. त्यामुळे सैन्य भरती करताना ताकदवान, शारीरिक तंदुरुस्त, धाडसी. पराक्रमी व्यक्तीचा समावेश केलेला असे. पायदल सैन्यात दोन श्रेण्या होत्या.

१) आह्दशमस २) शिबंदी या विभागातील सैनिक तलवार, भाला, धनुष बाण ही शस्त्रे बाळगत असे. बादशाही दरबारात वेगवेगळ्या विभागात एक हजार तलबार पटू सदैव असे.

**४) तोफखानाः**

मोगल लष्करात तोफखाना हा महत्त्वाचा विभाग होता. यांच्या विभाग प्रमुखाला दरोगा तोफखाना किंवा मीर-ए-अत्तीश असे म्हणत. या विभागात वेगवेगळ्या प्रकारच्या बंदुका व तोफा असे. तोफखान्याकडे दोन विभाग होते. एका विभागात लहान-मोठ्या व जड तोफा होत्या. तर दुसऱ्या विभागात बंदुकधारी सैन्य होते. तोफा बनवण्यासाठी पाश्चात्याची मदत घेत असे. अकबराने स्वतः लक्ष देऊन अनेक तोफा बनवून घेतल्या. आर्बिनच्या मते- "औरंगजबेचा तोफखाना सर्वापेक्षा प्रभावी व परिपूर्ण होता. औरंगजेबचा तोफखाना प्रमुख इटालीयन प्रवासी मनूची हा होता. मोठ्या तोफांची जलमार्गाने वाहतूक होत असे."

**५) नौदल / नाविकदल / आरमारः**

मोगलाचे नाविक दल लहान स्वरूपाचे होते. त्यांचे लहान आरमार किनारी किंवा नदी किनारी असे. नाविक दलाच्या प्रमुखाला मीर-इ-बहर किंवा दरोगा नववारा असे म्हणत. बोटीचा उपयोग साहित्य वाहतुकीसाठी, सैन्याची वाहतूक प्रवास यासाठी होत असे. मोगलांनी स्वतंत्र असे स्वतःचे आरमार निर्माण केले नाही. आरमाराची सर्व जबाबदारी जंजिऱ्याच्या सिद्दीवर सोपवली होती.

**६) सुरक्षादलः**

मोगल काळात ग्रामीण भागातील सुरक्षादलाची व्यवस्था परंपरागत होती. खेड्याची शांतता व सुरक्षा ठेवण्याचे काम ग्रामप्रमुखाकडे होते. सरकार मध्ये फौजदार व त्याचे सुरक्षा पथक असे. शहरात कोतवाल व त्याचे खास सुरक्षा पथक व गुप्तहेरांची तुकडी असे. दरोडे चोर, लुटमार खून, बलात्कार इ. गुन्हाचा शोध घेणे, गुन्हेगारी खटले चालवणे, गस्त घालणे, लबाडी करणाऱ्या व्यापाऱ्याऱ्यांना शिक्षा करणे इ. कामे करत असे.

**मुसलमानी विचारवंत व त्यांच्या संकल्पना**

राज्य आणि समाज याबद्दलच्या प्राचीन भारतीय संकल्पनांवर बरेच लिहिले गेले आहे, परंतु मध्ययुगीन संकल्पनांबद्दल विशेष लिहिले गेले नाही. मुसलमानी विचारवंतांच्या संकल्पना बव्हंशी भारताबाहेर विकास पावल्या. तरी काही ना काही स्वरूपात भारतातील मुस्लिम राजवटीवर त्यांचा प्रभाव पडला. या प्रकरणात सहा प्रमुख मुसलमानी विचारवंतांच्या संकल्पनांचा आढावा घेतलेला आहे.

**फाराबी (८७०-९५०)**

फाराबी हा तुर्क होता. फाराब नावाच्या ट्रॅन्सओक्सियानाच्या जिल्ह्यात त्याचा जन्म झाला. त्याकाळी साहसी राज्यकर्त्यांच्या प्रयत्नाने बऱ्याच नवीन राजवटींचा उदय झालेला होता. आणि इस्लाम धर्माच्या अनुयायांमध्ये वंश, पंथ, तत्त्वज्ञान आणि संस्कृती यासंबंधित भेदभाव निर्माण झालेले होते. या सर्व कारणांमुळे अब्बासी अंमल संकटग्रस्त झालेला होता. अब्बासी खलीफाची सत्ता दुबळी झालेली होती. मुस्लिम जगतावरील त्याचा प्रभाव नाममात्र होता आणि बलिष्ठ राज्यकर्ते आपली स्वतंत्र सत्ता जाहीर करू शकत होते.

फाराबी विद्वान म्हणून बगदादला गेला. तेथे त्याला सैफउद्दौला याचा आश्रय मिळाला. फाराबी हा अष्टपैलू पंडित होता. त्याने तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, राज्यशास्त्र, गणित, पदार्थविज्ञान आणि संगीत अशा विविध विषयांचे अध्ययन केले. त्याने विपुल ग्रंथलेखन केले. तर्कशास्त्र, प्लेटोचे नियम, भौतिक शास्त्रे, अरिस्टॉटलने लिहिलेल्या पदार्थविज्ञानशास्त्रावरील टीका, हवामानशास्त्र, आकाश आणि विश्व, आकाशातील ग्रह व तारे, मानसशास्त्र आणि तत्त्वज्ञान या विषयांवर त्याने काही सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिले. इ.स. ९४६ मध्ये फाराबी दमास्कसला गेला. हे शहर पूर्वी उमदीय खलीफांची राजधानी असून यावेळी सैफउद्दीनच्या ताब्यात होते. फाराबीच्या मृत्युसमयी त्याचे वय सुमारे ऐंशी वर्षांचे होते. फाराबीने राज्यशास्त्रावर पाच ग्रंथ लिहिले, त्यात 'सियासत-उल्-मदनिया' आणि 'आराउ-अहलिल-मदीनतुल-फाजिला 'हे दोन महत्त्वाचे होते. 'मदीनतुल-फाजिला' *(म्हणजे 'आदर्श नगर')* हे इ. स. ९४१-४२ मध्ये म्हणजे त्याच्या मृत्यूच्या काही वर्षे आधी लिहिले गेले. म्हणून हे पुस्तक त्याच्या परिपक्व विचारांचे फळ होते. सियासतमध्ये फाराबीने मानव आणि पशूमधील भेद, सामूहिक कार्याची गरज, एकत्र राहण्याचा मानवी स्वभाव व त्याचा परिणाम, 'आदर्श नगर' *(म्हणजे 'आदर्श नगरराज्य')* यांच्या अस्तित्वाची गरज, हुकुमशाही (*tyranny),* एकतंत्री राजेशाही (*autocracy)* प्रजासत्ताक राज्य वगैरे राज्याचे किंवा शासनसंस्थेचे प्रकार, यांचे विवेचन केले आहे. 'आरा' या ग्रंथात मुख्यतः आदर्श राज्य, सार्वभौमत्व, साम्यवाद (*Communism)* व्यक्ति-स्वातंत्र्यवाद (*Individualism)* पितृसत्ताक राज्य - पद्धतीचा सिद्धांत, परस्पर हक्कत्यागाचा सिद्धांत वगैरे विषयांचे विवेचन आलेले आहे. फाराबीच्या या दोन ग्रंथांनी आपणास दहाव्या शतकातील मुसलमानी राजकीय विचारांचे दर्शन घडते. मानवांना अनिवार्यपणे एकत्र येऊन आपले गट करावे लागतात, असे

फाराबीला वाटते. काही मूलभूत गरजा भागविण्यासाठी, जीवनात सुखसोयी उपलब्ध करून घेण्यासाठी आणि जास्तीत जास्त प्रगती साधण्यासाठी मनुष्यप्राणी अनिवार्यपणे एकत्र येतात. पूर्ण आणि अपूर्ण अशा दोन प्रमुख समुच्चयात माणसे एकत्र येतात. खेड्याचा लोकसमुदाय, शहरी उपविभागाचे लोकसमुदाय, रस्त्यावरील तसेच विश्रांतिस्थानातील जनसमूह हे सर्व अपूर्ण जनसमुच्चय आहेत तर नगर (राज्य), राष्ट्र, आणि सबंध मानववंश हे पूर्ण जनसमुच्चय आहेत. एकीची किंवा सामूहिक जीवनाची मूलभूत गरज भासली तरी भौगोलिक स्थितीसारखे नैसर्गिक भेद आणि भाषांसारखे कृत्रिम भेद यांमुळे मानवप्राणी एकमेकांपासून वेगळे केले जातात आणि म्हणून ते एकच असा अखंड जनसमुच्चय न करता वेगवेगळे गट बनवितात. फाराबी म्हणतो की, 'पूर्ण' जनसमूहांचा एक प्रकार असलेल्या

नगर किंवा राज्यामध्येच लोकांचे परम हित (*highest good)* साध्य होईल. फाराबीने हॉब्सच्या (१५८८-१६७९) आधी सहा शतकांपूर्वीच राज्यनिर्मितीबद्दलचा सिद्धांत मांडला. स्वभावतः लोक असमान असतात. काही लोक हुशार, धूर्त आणि जुलमी (*overbearing)* असतात तर काही इतर लोक निष्पाप, साधे आणि नम्र असतात. यामुळे लोकांमधील संबंध बिघडतात आणि त्यांचे जीवन दुःखमय होते. या अनिष्ट जीवनपरिस्थितीचे निवारण करण्यासाठी लोक एकत्र येतात, वस्तुस्थितीचा विचार करतात. आणि प्रत्येकजण आपल्या ज्या अंगभूत शक्तीमुळे दुसऱ्याला अंकित करू शकतो त्या शक्तीचा काही भाग विसर्जन करतो. परस्परांशी पूर्ण सहकार्य व शांततेने वागण्याची जाण ठेवली जाईल व दुसऱ्याकडून सक्तीने काहीही घेतले जाणार नाही असे ठरते. (*Ara, p. 13)*.

अशाप्रकारे लोक सर्वांच्या हितासाठी आपापले नैसर्गिक हक्क सोडून देऊन परस्परांमध्ये प्रसंविदा करतात. ही प्रसंविदा झाल्यानंतर देखील कोणीतरी दुसऱ्यांचे स्वातंत्र्य हरण करून प्रसंविदेचा भंग केल्यास, सर्व लोक त्याच्या विरुद्ध उभे राहतील आणि पुन्हा स्वातंत्र्य मिळवतील. हॉब्सने लिहिलेल्या 'लेव्हियाथन' या ग्रंथातील संबंधित उतारा पाहिल्यास फाराबीचे विचार आणि हॉब्सचे विचार यातील साम्य स्पष्ट होते. लेव्हियाथन (*Leviathan, XVII)* मध्ये हॉब्स लिहितो की, राज्य (*commonwealth)* निर्मिती झाली तेव्हा प्रसंविदेमुळे खरी एकात्मता साधण्यात आली. या प्रसंविदेत जणु प्रत्येक व्यक्ती प्रत्येक दुसऱ्या व्यक्तीला म्हणते, 'मी ह्याला किंवा या जनसमूहाला स्वतः वर अंमल करण्याचा माझा हक्क आणि अधिकार विसर्जन करतो. तू पण माझ्याप्रमाणे आपला हक्क त्याला सोडून देशील तसेच सर्व कार्याबद्दल अधिकार देशील असे गृहीत धरतो.' मात्र फाराबी आणि हॉब्स यांच्या विचारांमध्ये एक महत्त्वाचा फरक आहे. हॉब्सच्या मते प्रसंविदा मोडणाऱ्याला सरकार निर्दयतेने शिक्षा देते ? आणि प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य पूर्ववत् सुरक्षित करून देतात. एका दृष्टीने फाराबीचा हा विचार हॉब्सच्या सामाजिक प्रसंविदा सिद्धांतातील विचारापेक्षा पुढे आहे. फाराबीचे विचार हॉब्सपेक्षा लॉकच्या विचारांशी जास्त मिळते जुळते असल्याचे दिसून येते. सार्वभौमत्वाबद्दल फाराबीचे विचार समर्पक निष्कर्ष काढण्याची योग्यता ज्याच्याकडे असते तोच लोकनेता होण्यास पात्र ठरतो असे फाराबीला वाटते. समर्पक निष्कर्ष काढल्यानंतर, ते निष्कर्ष लोकांपर्यंत पोहोचविण्याची आणि आपले महत्त्वाचे विचार दुसऱ्याला पटवून देण्याची शक्ती असेल तर त्याचे धुरीणत्व सार्थ व गतिशील बनते. अशा लोकनेत्याला फाराबी 'रईस-उल्-अव्वल' म्हणतो. 'रईस-उल्-अव्वल' म्हणजे अग्रेसर नेता आणि तोच राज्याचा सार्वभौम. फाराबीच्या 'रईस'ला कोणी आदेश देऊ शकणार नाही, उलट निरीक्षण करून स्वतः शिकण्याची आणि आपले विचार दुसऱ्यांना कळविण्याची कुवत त्याच्याजवळ आहे. (*Ara, pp. 48ff)* सार्वभौमत्त्व सिद्धांताचा पुरस्कर्ता म्हणून फाराबीच्या बोर्दे (१५३०-१५९६) आणि ऑस्टिन (१७९०-१८५९) यांच्याशी तुलना केली तर, फाराबीचे विचार आणि ऑस्टिनचे विचार यांच्यामध्ये जास्त साम्य आढळते. बोदाँच्या सार्वभौमाजवळ मूलभूत मानले गेलेले काही विधिनियम बदलण्याचे सामर्थ्य नाही तर ऑस्टिनच्या विधिमय सार्वभौमा (*Legal Sovereign)* ची सत्ता अमर्याद आहे. सार्वभौम हा स्वतः एक निश्चित (*determinate)* वरिष्ठ मानव असून दुसऱ्या वरिष्ठ मानवाच्या आज्ञेखाली रहाणे त्याचा स्वभाव नाही, असे ऑस्टिनला वाटते तर फाराबी म्हणतो की, रईस किंवा अग्रेसर नेत्याच्या वर आदेश देणारी कोणी वरिष्ठ व्यक्तीच नाही.

सार्वभौमाबद्दलचा प्लोटोचा आदर्श साधणे अशक्य होते. परंतु फाराबी सार्वभौमात बारा आवश्यक गुण ठेवून सार्वभौमाबद्दलचा आदर्श, अंशतः का होईना, साधणे शक्य करण्याचा प्रयत्न करतो. जसजसे आदर्श सार्वभौमाचे हे बारा गुण सत्ताधारी राज्यकर्ता आत्मसात करतो तसतसे तो आदर्शाच्या जवळ येतो.

फाराबीच्या आदर्श सार्वभौमाचे बारा गुण पुढीलप्रमाणे आहेत (१) उत्तम अवयव, (२) चांगला समजूतदारपणा, (३) सांगितलेले सर्व काही मनात चित्रीकरण करणे, (४) उत्तम स्मरणशक्ति, (५) स्पष्ट आकलन शक्ति, (६) गाढ विद्याप्रेम प्रदर्शित करण्याची शक्ति, (७) बालिशपणाचा त्याग, (८) इंद्रियसंयम, (९) सत्यप्रेम, (१०) अंतःकरणाची विशालता, (११) निर्भयता, आणि (१२) पुरेशा संपत्तीची मालकी. एकाच व्यक्तीमध्ये हे सर्व गुण असणे अशक्य आहे. म्हणून फाराबीने काही पर्याय सुचविले आहेत. वरील सर्व गुण असलेले दोन किंवा पाच सभासदांचे

एक मंडळ निर्माण करावे, जनहितदक्ष नेत्याची नेमणूक करावी, आणि देशातील मूलभूत कायदे व परंपरांप्रमाणे वागावे असे त्याने सुचविले. येथे फाराबीने आपला आदर्श सार्वभौम आणि तत्कालीन खलीफा यांच्यामधील फरक स्पष्ट दाखविला आहे.

हे लक्षात ठेविले पाहिजे की, फाराबी कुठलाही राजकीय सिद्धांत स्पष्ट शब्दात मांडत नाही. वेगवेगळ्या संदर्भात तो विचार प्रकट करतो आणि त्यांचे स्पष्टीकरण करून, त्यांचा अर्थ लावून त्यात कुठले तरी सिद्धांत सूचित आहेत की काय हे बघता येते. अशा रीतीने त्याच्या विचारांचे विश्लेषण केल्यास त्यात तीन सिद्धांत प्राथमिक किंवा अपूर्णावस्थेत सूचित केल्याचे दिसते. ते सिद्धांत म्हणजे शक्तिसिद्धांत, सेंद्रिय सिद्धांत आणि सामाजिक प्रसंविदा सिद्धांत. आपण आधीच पाहिले आहे की, वैयक्तिक हक्कांचा परस्पर त्याग ही फाराबीची संकल्पना आणि हॉब्स व लॉक यांच्या प्रसंविदा सिद्धांत यांच्यामध्ये काही तुलनात्मक अंश आहेत. काही ठिकाणी तो म्हणतो की, समाजाच्या प्राथमिक अवस्थेत प्रबळ लोकांनी दुबळ्या लोकांवर जुलूम करून आपले नियंत्रण ठेवले आणि त्यांच्यावर राज्य करू लागले. अशा रीतीने दुबळ्यांवर अंमल गाजविणाऱ्या प्रबळ लोकांचा प्रदेश असा एक राजकीय घटक अस्तित्वात आला. आणि हा राजकीय घटक म्हणजेच राज्य. येथे निश्चितपणे शक्तिसिद्धांत सूचित केला गेला आहे. सेंद्रिय शरीररूपी राज्याबद्दल फाराबीने काही विचार मांडले आहेत. फाराबी म्हणतो की, ज्याप्रमाणे हृदय हे शरीराचे अत्यंत महत्त्वाचे इंद्रिय आहे, त्याचप्रमाणे 'रईस' हा राजकीय शरीराचे अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. हा 'रईस'च राज्याच्या विभिन्न भागांची नीट मांडणी करतो व सबंध राजकीय शरीराला होणारा त्यांचा उपयोग अनुलक्षून त्यांच्या कार्याची व्यवस्था करतो आणि त्यांचे सापेक्ष महत्त्व ठरवितो. राज्याचे हृदय असलेला 'रईस' आणि राज्याचे इतर अंग यांच्यामधील अंतरावरून त्या त्या अंगाचे महत्त्व कमी अधिक होत असते. राज्याचे सदस्य किंवा लोक हे स्वतंत्र व्यक्ति आहेत, एखाद्या साम्यवादी राज्यातील यांत्रिक भाग नव्हेत, असे फाराबी समजतो. काही वेळा फाराबी आपल्या लिखाणात पितृसत्ताकराज्य सिद्धांत सूचित करतो. या संदर्भात तो म्हणतो की, ज्याप्रमाणे एकाच आई-वडिलांची मुले आपापसात इतरांपेक्षा जास्त खुषीने मिसळतात व सहकार्य देतात त्याचप्रमाणे एकाच राज्यात जन्मल्याने वेगवेगळे लोक एकाच आई-वडिलांची मुले असल्यासारखे एकत्र येतात.

फाराबीला साम्राज्य, वसाहत, प्रजासत्ताक राज्य अशा विविध प्रकारच्या राज्यांची कल्पना होती. साम्यवाद, व्यक्तिस्वातंत्र्यवाद, प्रजासत्ताकवाद आणि वसाहतवाद यांच्याशी तुलना करता येईल असे विचार फाराबीने प्रकट केले आहेत. त्याच्या राजकीय विचारसरणीवर प्लेटोवाद आणि नवा प्लेटोवाद यांची छाप पडलेली दिसते. तो एक प्रभावी विचारवंत होता आणि पुढे त्याच्या विचारांना घझाली आणि इब्न खल्टून अशा त्याच्या बौद्धिक वारसांकडून पुष्टी मिळाली.

**घझाली (१०५८-११११)**

तूसजवळ घझाला येथे घझालीचा जन्म झाला. इ.स. १०९१ मध्ये बगदादमधील शिक्षणसंस्थेत तो प्राध्यापक झाला. पण बगदादमध्ये तो फार वेळ राहिला नाही. इ. स. ११०५ मध्ये नीशापूर येथील विद्यापीठात त्याला अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले. शेवटी तो तूसला जाऊन तेथेच स्थायिक झाला. 'मुन्कीज मिनअज जलाल' (स्वच्छंदपणापासून मुक्तता), 'इह्या-उल्-उलूम' (शाखांचे प्रबोधन), 'तिबुल-मसबूक' (वितळलेले सोने), आणि सिफल -आलमैन' (दोन जगतांचे गूढ) हे त्याचे काही महत्त्वाचे ग्रंथ आहेत. या सर्वात 'इह्या' हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ मानला गेला.

घझालीच्या विचारसरणीचे मूलभूत लक्षण म्हणजे तो बौद्धिक जाणीवे (*intellectual perception)* ऐवजी स्वानुभवा (*personal experience)* ला ग्राह्य समजतो. केवळ भौतिकवादा (*rank materialism)* ऐवजी आध्यात्मिक आनंदाला (*spiritual elation)* अग्रस्थान देतो. त्याचा चिकित्सक (*sceptical)* वैचारिक दृष्टिकोन होता आणि बऱ्याच हटवादी तत्त्वांच्या औचित्याबद्दल आपला संशय त्याने प्रकट करून दाखविला. शुष्क, निराधार वादविवाद आणि बौद्धिक परिकल्प (*intellectual speculation)* यांचा

त्याग करून त्याने स्वानुभव आणि प्रेषित व संतांची अनुभूती यांना प्रमाणभूत मानले. राज्यशास्त्र आणि नीतिशास्त्र यांच्यामध्ये अगदी जवळचा संबंध आहे, असे तो मानीत असे. मानवी जीवन धन्य करणारे सुखमय साधन म्हणून नैतिक आचारसंहितेला त्याने फार महत्त्व दिले. घझाली हा अध्यात्मवादी असल्याचे मानले गेले, तरी ऐहिक जीवनाकडे तो दुर्लक्ष करीत नाही. प्रेषित व इतर संतांच्या पद्धतीप्रमाणे, घझालीने या जगातील कार्य आणि श्रम यांना फार महत्त्व दिले आहे. या पृथ्वीतलावरील जीवन क्षणिक आहे. प्रत्येकाने पवित्र आणि शुद्ध जीवन जगले पाहिजे, असे त्याला वाटे. दंगेधोप्यामुळे राज्यात अशांतता निर्माण झाली तर माणसाला मनःशांती मिळत नाही, भगवद्‌भजन करण्यास अनुकूल परिस्थिती मिळत नाही. म्हणून राज्याला सुसंघटित करणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे, हे त्याचे मत होते. हे खरोखरच उत्तम व्यवहारचातुर्य आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन भारतातील हिंदूमध्ये सर्वसंग - परित्याग केलेल्या ऋषि-मुनींनी आपल्या एकांतांतून बाहेर पडून समाजकल्याणासाठी राजकीय परिस्थितीची घडी नीट बसविल्याची बरीच उदाहरणे आहेत. चाणक्य आणि विद्यारण्याची उदाहरणे सर्वश्रुतच आहेत. राजनीतीवरील घझालीचे विचार 'लौकिक स्वरूपाच्या राज्यव्यवहाराच्या योग्य व्यवस्थेचे विवेचन करणारे शाख' अशी राज्यशास्त्राची व्याख्या घझाली करतो. तो पुढे म्हणतो की, ते शास्त्र परमेश्वरी ग्रंथातून किंवा संतांच्या आदेशांतून घेतले गेले. परमेश्वरी शब्दाला कायदा आणि राज्यशास्त्राचा पाया बनविण्याची प्रथा युरोपमध्ये शतकानुशतके चालली होती. राज्य-संकल्पने (*state-idea)* चा शोध लावताना घझाली राज्याच्या अस्तित्वाच्या आवश्यकतेवर म्हणजेच राज्याच्या निर्मितीवर चर्चा करतो. मानव समाजप्रिय प्राणी आहे. स्वभावतः तो एकटा राहू शकत नाही. इतर मानव प्राण्यांच्या सहवासांत तो राहू इच्छितो. इतर मानव प्राण्यांचा सहवास (१) प्रजोत्पादन आणि (२) संरक्षण (तसेच प्रगती) या दोन कारणांमुळे अनिवार्य होतो. स्वतःची जात चिरस्थायी करण्यासाठी मानवाला सहचारिणी लागते, आणि मग स्वतःचे संरक्षण तसेच आपल्या कुटुंबियांचे संरक्षण आणि निर्वाहासाठी त्याला इतरांची मदत लागते. निरनिराळे व्यापारोद्योग आणि धंदे करणाऱ्यांमध्ये देखील सहकार्य असावे लागते. त्यांनी परस्परांना मदत केल्याशिवाय समाज टिकणार नाही. आपल्या शेतीच्या साधनांसाठी किंवा अवजारांसाठी शेतकऱ्याला सुतार आणि लोहार यांच्यावर अवलंबून राहावे लागते. धान्याच्या व्यापाऱ्यांना शेतकऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. नैसर्गिक शक्तीपासून संरक्षण करून घेण्यासाठी घरे बांधली पाहिजेत. स्वारी करणाऱ्यांपासून स्वतःचे संरक्षण करून घेण्यासाठी खेड्याभोवती किंवा शहराभोवती तटबंदी व किल्ले बांधावे लागतील. याच्यासाठी देखील लोकांना एकत्र यावेच लागते. शहरे बांधल्यानंतर जेव्हा लोक तेथे स्थायिक होतात तेव्हा त्यांच्या हितसंबंधांमधील मतभेद किंवा विरोधामुळे अनिवार्यपणे मनःस्ताप आणि भांडणे उद्‌भवतात. यामुळे साहजिकच झगडे आणि भांडणे सोडविण्यासाठी मध्यस्थीची व शासनाची गरज भासते. या विवेचनाने घझालीचे राज्यनिर्मितीबद्दलचे विचार आणि युरोपातील सामाजिक

प्रसंविदा सिद्धांत यांच्यामधील काही साम्य स्पष्ट होते. घझालीने सांगितलेल्या राजपदाच्या उत्पत्तीच्या सिद्धांतामध्ये लॉकच्या सामाजिक प्रसंविदेचे काही अंश आढळतात. लॉकच्या सिद्धांताप्रमाणे, नैसर्गिक अवस्थेमधील गैरसोयीपासून सुटका करून घेण्यासाठी लोकांनी आपापसात प्रसंविदा करून शासनाची निर्मिती केली. घझाली म्हणतो की, राज्यकर्त्याशिवाय राजकीय संघटना, म्हणजे राज्य, राहू शकत नाही; राजकीय संघटनेशिवाय परमेश्वराचे आदेश योग्य रीतीने पाळता येणार नाहीत; आणि म्हणून अशा संघटनेला इस्लामी कायद्याची मंजूरी असते. ज्याला लोक सवयीने आज्ञाधारक असले पाहिजेत, अशा राज्यकर्त्याशिवाय (जगात) 'सतत गोंधळ माजेल, तरवारी बदलणे कधी संपणार नाही, दुष्काळ वरचेवर पडत राहील, वरचेवर गुरांना रोग होत राहतील, उद्योगधंदे आणि हस्तकला यांचा अंत होईल." घझालीने सांगितलेली 'नैसर्गिक अवस्था' आणि हॉब्स व लॉक यांनी सांगितलेली 'नैसर्गिक अवस्था' यांच्यातील मनोवेधक साम्य तसेच ऑस्टिनने मांडलेला विधिमय सार्वभौमत्व सिद्धांत व घझालीने मांडलेला सार्वभौमत्त्वाचा प्रगत सिद्धांत यांच्यातील साम्य, हे आश्चर्यकारक आहे. पण ऑस्टिनचा सार्वभौमत्व सिद्धांत घझालीच्या सिद्धांता- प्रमाणे 'असा पुढारलेला नव्हता' *(not such a great step forward)* शेरवानी यांच्या या म्हणण्याशी सहमत होणे शक्य नाही. महसूल गोळा करणारा अधिकारी, महसूल आकारणी अधिकारी, कोषाध्यक्ष आणि पगार वाटणारा अधिकारी यांच्याबद्दल देखील घझालीने लिहिले आहे. घझाली लोकसमुदायाची

विभागणी (१) शेतकरी व कारागीर, (२) तलवारीचे लोक (*men of the sword)* आणि (३) लेखणीचे लोक (*men of the pen)* अशा तीन वर्गात करतो. पुढे आर्थिक विनिमय (*economic exchange)* स्थिर चलनाची श्रेष्ठता, व्यापारी मालाची गमनशीलता, द्वि-धातु-चलन आणि त्रि-धातु- चलन यांचे विवेचन त्याने केले आहे.परस्परावलंबनाचे तत्त्व ही घझालीच्या सामाजिक आणि राजकीय संकल्पनेची गुरुकिल्ली आहे. व्यक्तिव्यक्तीमधील परस्परावलंबनानेच समाज टिकतो. सामाजिक सदस्यांमधील (लोकांमधील) परस्परावलंबनाचे संबंध राखण्याच्या गरजेमुळेच राजपद अस्तित्वात येते; मानवी समाजाचा आधार असलेला धर्म आणि हा आधार जतन करणारा राज्यकर्ता यांच्यामधील परस्परावलंबनच समाजाचे संवर्धन करते. वरील सिद्धांताशिवाय आणखी एक सिद्धांत घझालीने मांडलेला दिसतो, आणि तो म्हणजे सेंद्रिय राज्य सिद्धांत (*Organismic Theory of the State)*. घझालीच्या विचारात येत असलेली ही संकल्पना नंतर हर्बर्ट स्पेन्सरने (१८२०- १९०३) आपल्या *Principles of Sociology* (समाजशास्त्राची तत्त्वे) या ग्रंथात सिद्धांत रूपात स्पष्टपणे आणि शास्त्रीय पद्धतीने मांडली. घझाली नगरा (राज्य) ची भौतिक देहाशी तुलना करतो. नगर म्हणजेच भौतिक देह, व्यवसाय हेच त्याचे अवयव, आदेश देणारा फौजदारी न्यायाधीश हीच त्याची इच्छा, पोलीस अधिकारी हाच त्याचा क्रोध; राजा हाच त्याचे हृदय; आणि मंत्री हाच त्याचे व्यवहारज्ञान. न्यायदानाबद्दल तो म्हणतो की, आरोपीच्या गुन्ह्याचा प्रकार आणि

अपराध्याची सहनशक्ती हे दोन्ही लक्षात घेऊन शिक्षा सुनवावी. अशा प्रकारचा विचार हिंदू धर्मशास्त्रात देखील आढळतो. पुढे, राजाची पात्रता आणि कर्तव्ये याबद्दल घझालीने लिहिले आहे. तो म्हणतो की, आदर्श राज्यकर्त्यांच्या अंगी बुद्धिमत्ता, ज्ञान, शौर्य, प्रजाप्रेम, दूरदृष्टी वगैरे गुण असावेत. थोडक्यात, घझालीने बौद्धिक ज्ञानाऐवजी प्रत्यक्ष अनुभवाला महत्त्व दिले,

मानवाच्या समाजप्रिय स्वभावावर भर दिला, समाजाच्या सभासदामधील परस्परावलंबनाची गरज दाखविली, 'नैसर्गिक अवस्थेचे' चित्रण केले, सार्वभौमत्त्वाचा सिद्धांत मांडला, राज्याचे जीवशास्त्र पद्धतीने स्पष्टीकरण केले, योग्य न्यायदानाचे महत्त्व दाखवून दिले, आणि आदर्श राज्यकर्त्यांची तसेच मंत्र्यांची पात्रता व कर्तव्ये याबद्दल नियम घालून दिले. वादविवादाच्या विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक पद्धतीत घझाली मावर्दीपेक्षा श्रेष्ठ होता. स्वतंत्र ग्रंथ आणि दर्जेदार पुस्तिका लिहिण्यात तो कैकाऊसपेक्षा श्रेष्ठ होता, आणि आपल्या स्वतंत्र आणि समतोल अशा विश्लेषणात्मक विचारपद्धतीत तो तूसीपेक्षा श्रेष्ठ होता.

**शुक्राचार्य**

शुक्राचार्याने लिहिलेला 'शुक्रनीतिसार' हा ग्रंथ मध्ययुगातील राजनीतीवरचा पहिला मोठा ग्रंथ होय. यात पारंपरिक गोष्टींशिवाय शुक्राचार्याचे स्वतःचे असे बरेच मूळ विचार आढळतात. हा ग्रंथ सुमारे तेराव्या शतकाच्या आधी लिहिला गेला असे आता सामान्यपणे मानले जाते. शुक्राने हा ग्रंथ केवळ राजेरजवाड्यांसाठीच नव्हे तर सामान्य जनतेच्या मार्गदर्शनासाठी देखील लिहिला. तेव्हा त्याची व्याप्ती विस्तृत आहे. शुक्रनीतिसाराचे चार भाग असून, पहिला आणि दुसरा भाग राजा आणि राजधर्म, राजपुत्राची लक्षणे इ. विषयांबद्दल आहेत, तिसरा भाग राजाच्या तसेच जनतेच्या एकूण आचार संहितेबद्दल आहे तर चौथ्या भागात इतर विविध विषय आलेले आहेत. या भागात आठ विभाग असून त्यात मित्र, शत्रू आणि तटस्थ यांची लक्षणे, महसूल, राज्याची मालकी जमीन, जनतेची कर्तव्ये, विधिनियम आणि न्यायालयीन प्रक्रिया, तटबंदी आणि सैन्य अशा विषयांबद्दलचे विवेचन आलेले आहे.

शुक्राचा समाजरचनेचा सिद्धांत शुक्रनीतिसारामध्ये ठिकठिकाणी शुक्राच्या स्वतंत्र विचारांचे दर्शन होते. समाजाचा उदय आणि रचना याबद्दल शुक्राने पारंपरिक ब्राह्मण कल्पनेचा त्याग करून आपले स्वतंत्र विचार मांडलेले आपणास प्रथम दिसतात. पारंपरिक प्राचीन सिद्धांताप्रमाणे समाज ही एक दैवी निर्मिती आहे, त्यातील चतुर्वर्ण आणि त्यांचे स्थान हे सुद्धा दैवनिर्मित आहे. वैदिक काळापासून अशी कल्पना होती की, ब्रह्माच्या मुखातून ब्राह्मणवर्ग निर्माण झाला, त्याच्या भुजातून क्षत्रिय वर्गाची निर्मिती झाली, त्याच्या मांड्यातून वैश्यवर्ग निर्माण झाला आणि त्याच्या पायातून

शूद्रवर्ग आला. नंतर माणसाचे स्थान त्याच्या जन्मावरून निश्चित करण्यात येऊ लागले. शुक्राचार्य मोठ्या धैर्याने हा विचार बाजूला सारतो आणि घोषणा करतो की, व्यक्तीचा सामाजिक दर्जा जन्मावरून ठरत नसून तिच्या गुणावरून व कार्यावरून ठरतो. मानवाचे प्रयत्न आणि त्याचे दैव, म्हणजे त्याने पूर्वजन्मी केलेले प्रयत्न, यामुळे माणसामाणसांमध्ये भेद निर्माण होतात व परिणामी सामाजिक वर्गातील त्याचा दर्जा निश्चित केला जातो. अर्थात विविध वर्गात झालेली सामाजिक विभागणी याचा उलगडा दैवी इच्छेने नव्हे तर वरील कर्मसिद्धांताने होतो. तेव्हा समाज ही मानवी निर्मिती आहे, दैवी निर्मिती नव्हे.

शुक्राचा सार्वभौमसत्ता सिद्धांत शुक्राने सांगितलेली सार्वभौम सत्तेची संकल्पना, राजत्वाचे मूळ, राजाचे पद आणि राजाची कर्तव्ये या तीन गोष्टींवर आधारित आहे. (१) इंद्र, वायू, यम, सूर्य, अग्नी, वरुण, चंद्र आणि कुबेर या देवतांच्या शाश्वत अंशांनी राजाची निर्मिती झाली आहे. या जन्मातील तपश्चर्या आणि पूर्वजन्मातील पुण्य यामुळे राजा सार्वभौम सत्ता गाजविण्यास पात्र ठरतो म्हणून तो सार्वभौम बनतो. या सार्वभौमसत्तेला शुक्र 'स्वामित्वम' किंवा 'ईशता' म्हणतो. या सार्वभौम सत्तेमुळेच तो संरक्षक, निर्देशक (*director)*, आनंददाता आणि जगसंवर्धक बनतो (१:२०) (२) राजाचे स्थानच असे आहे की, त्यामुळे राजाला आपोआपच सार्वभौम सत्ता मिळते. राजाच्या संरक्षणाशिवाय लोक आपली कर्तव्ये करू शकत नाहीत. याचाच अर्थ समाजविरोधी आणि विघ्नकारी शक्तींना आळा घालून लोकांना संरक्षण देण्याचे सामर्थ्य राजाजवळ असते. (१:६४-६६). (३) शेवटी राजाच्या स्थानाला अनुसरून त्याला कराव्या लागणाऱ्या कर्तव्यामुळे आवश्यक ते सार्वभौम अधिकार त्याला मिळतात. त्याच्या कर्तव्यपालनात त्याची विविध देवतांशी तुलना केलेली आहे. (१:७२-७६). माता, पिता, गुरु, बंधू, मित्र, कुबेर आणि यम यांचे विशिष्ट गुण राजाच्या अंगी असतात. या सात विशिष्ट गुणांच्या योगे तो त्यांना अनुरूप सात प्रकारची आवश्यक कामे करतो. सार्वभौमसत्ता ही जनहितासाठी कर्तव्ये करण्यासाठीच दिलेली आहे. हक्क आणि कर्तव्ये, सार्वभौमत्त्व आणि लोकहित दक्षता, अधिकार आणि सेवा, राजाच्या स्थानाबद्दलच्या या दोन्ही गोष्टींमधील परस्पर संबंध ही प्राचीन तसेच मध्ययुगीन भारतीय कायदेतज्ज्ञांची आवडती कल्पना आहे. एकाच वेळी राजा लोकसेवक आणि लोकमालक आहे. शुक्राने राजाच्या नियमन अधिकारा (दंड) बद्दल लिहिले आहे. हा अधिकार विशेषतः न्यायविषयक क्षेत्रात अमर्याद दिसतो. गुण, नीति आणि बलरहित अधार्मिक राजाचा राष्ट्रविनाशक म्हणून त्याग केला पाहिजे. १ कर्तव्यभ्रष्ट राजाला त्याच्या शत्रूची देखील मदत घेऊन विरोध करण्याचा हक्क प्रजाजनांचा आहे असे शुक्र म्हणतो. येथे हा विचार आणि लॉकचा सामाजिक प्रसंविदा सिद्धांत यांच्यामध्ये काही साम्य आढळते. शुक्राच्या मते राजपद जरी दैवी निर्मिती असली तरी पुढे ते लोकांच्या उत्स्फूर्त आज्ञापालनावर अवलंबून असल्यामुळे त्याला थोडेसे सामाजिक प्रसंविदेचे स्वरूप येते. दैवनियुक्त असला तरी, तो बेजबाबदार बनू शकणार नाही. आणि येथेच भारतीय सार्वभौम सिद्धांताचे महत्त्व आहे.

**शुक्राचा सेंद्रिय सिद्धांत :**

शुक्राच्या लिखाणात सेंद्रिय सिद्धांताबद्दल काही अप्रत्यक्ष उल्लेख सापडतात. हीच राज्यकल्पना इतर काही प्राचीन आणि मध्ययुगीन संकल्पनाकारांच्या ग्रंथांत आढळते. शुक्र म्हणतो की, राज्याला सात अवयव असतात. ते अवयव म्हणजे सार्वभौम, मंत्री, मित्र, कोष, जनता, दुर्ग आणि सैन्य हे होत. या अवयवांच्या तौलनिक महत्त्वाबद्दल शुक्र म्हणतो की, सार्वभौम हा (या राज्य नावाच्या प्राण्याचे) मस्तिष्क किंवा डोके आहे. मंत्री हा डोळा आहे, मित्र हा कान आहे, कोष हे तोंड आहे, सैन्य हे मन आहे, दुर्ग हा भुजा आहे, आणि जनता ही पाय आहे. येथे काही मुद्द्यांचा खुलासा केला पाहिजे. शुक्राने राज्याच्या सात अवयवात 'राष्ट्र' याचा समावेश केला आहे. काही लेखकांनी त्याचा 'राज्य' असा अर्थ लावला आहे. पण येथे याचा अर्थ इतर संकल्पनाकारांनी वापरलेला 'जनपद' असा होतो. जनपद म्हणजे एका विशिष्ट भूप्रदेशावर स्थायिक झालेले लोक किंवा जनता होय. आणखी एका ठिकाणी शुक्राने राज्याची एका वृक्षाशी तुलना केली आहे. या राज्यवृक्षात राजा त्याचे मूळ आहे, मंत्री हे त्याचे खोड आहे, सेनापती हे त्याच्या फांद्या आहेत, सैन्य हे त्याची पाने आणि फुले आहेत, प्रजा ही त्याची फळे आहेत आणि भूमि हे त्याचे बीज आहे.' या दोन

रूपकांमध्ये शुक्राचार्याने राज्याच्या विविध घटकांच्या परस्परावलंबित्व आणि सार्वभौमाचे विशेष स्थान या दोन तत्त्वांवर भर दिला आहे.

